ऑ.नो.डि. २०१४ | मूल्य ३० रुपये

# सगुणा

असं हिरवं शिवार
कष्टाला नाही पार
माथी घेतला भार ।
रक्ताचा ग केला जाळ
जन्म झाला उभा माळ,
उद्या सरंल हा काळ
मोल भरलं आभाळ ।।
कसं राखावं हे रान
त्या निऋतीचं दान!
जीव ठेवावा गहाण
असं हिरव सपान ।




गणेश रामचंद्र आपटे
अथांग क्षितिजाची ... उत्तुंग झेप !
एक नातं शतकाचं... 'मे. गणेश रामचंद्र आपटे' आणि सोलापूरकरांचं...
सोनेरी धाग्यात गुंफलेलं... रूपेरी किनार आणि हिऱ्यामाणकांची कोंदण असलेलं...
आपणां सर्वांची सोनं, चांदी दागदागिने आणि जडजवाहीरांची हौस पुरविताना
आमच्या पाच पिढ्या सोलापूरकरांच्या सोनेरी विश्वासानं उजळल्या...
आता 'गणेश रामचंद्र आपटे' नव्या क्षेत्रात पदार्पण आहेत...
आजवर बावनकशी सोनं दिलं, आता अद्ययावत
घर देणार आहोत...'इंद्रधनु'च्या रूपानं...
सोलापूर शहराच्या मध्यवर्ती भागात साकारणारा
'इंद्रधनु'हा महागृहप्रकल्प सर्व सुखसोयींनी सुसज्ज असेल.
जिथं आपलं समृद्ध जीवनशैलीचं स्वप्न साकार होईल...
॥ गणेश रामचंद्र आपटे ॥
सोलापूर: फोन: २३२४१३९
आपटे ट्रेडर्स
सोलापूर: फोन: २३२६१२१
ज्वेलर्स
पुणे : २४४५७०९०
इंद्रधनु
Indradhanu
सोलापूर: फोन: २३८०३९०

# सगुणा

ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०१४ । वर्ष-२, अंक-४
संपादक : **शोभा करांडे** । संपर्क : ९४२२०१३५८८
कार्यकारी संपादक : **संगिता पाटील** । संपर्क : ९१५८८२९९७५
मुखपृष्ठ : **मल्हार करांडे**
मूल्य : ३० रुपये । वार्षिक वर्गणी : १०० रुपये, दशवार्षिक वर्गणी : १००० रुपये.

**या अंकात**

**संपादकीय** । ...पण लढलंच पाहिजे । २
**लेख** । एक अपारंपरिक, फेमिनिस्ट मित्र राजीव कालेलकर
डॉ. कुंदा प्रमिला नीळकंठ । ४
**लेख** । स्त्रिया गुलामच राहणार...। कॉम्रेड विलास सोनवणे । ७
**लेख** । स्त्रीमुक्ती-चळवळ पुरुषांना आपली वाटली पाहिजे । प्रकाश नाईक । १२
**लेख** । वाडीची विराऊ । विष्णू नारायण पावले । १५
**लेख** । सगुणा इचारात । नवनिर्मितीच्या नव्या वाटा । १८
**लेख** । क्रांतीचं स्वप्न पाहणारी 'ती' । शोभा करांडे । २२
**भाषण** । गावबांधणीतील महिलांचे स्थान व योगदान आणि दिशा । संगीता पाटील । २४
**वृत्तान्त** । प्रतिनिधी । २९
**अभिप्राय** । ३०
अखिल भारतीय महिला सम्मेलन (राजस्थान) । ३१
**कविता** । ३९-४०

'सगुणा'त्रैमासिकाची वर्गणी (रोख) आपण 'सगुणा चॅरिटेबल ट्रस्ट'च्या बँक अकाऊंटमध्ये जमा करू शकता । अकाऊंट नंबर : २००५७२०४३१८ : बँक ऑफ महाराष्ट्र, टिळक रोड शाखा, पुणे ४११०३० । आयफएस कोड : एमएएचबी ०००००४१ । वर्गणीचा धनादेश (चेक) 'सगुणा चॅरिटेबल ट्रस्ट'च्या नावे काढावा । अधिक माहितीसाठी संपर्क : श्री. अरुण करांडे : ९८२०२३५०३०

संपादकीय पत्रव्यवहार : सगुणा चॅरिटेबल ट्रस्ट, ७, माधव-लक्ष्मी अपार्टमेंट, २०७९, सदाशिव पेठ, विजयानगर कॉलनी, एस० पी० कॉलेजमागे, पुणे ४११०३० । दूरध्वनी : ०२०-२४३३७१२५ / ०९८२०२३५०३०

MAHMAR/2013/52241 / website : www.sagunatrust.org / Email : shobhakarande62@gmail.com

हा अंक मालक, मुद्रक, प्रकाशक शोभा करांडे यांनी श्रीबालाजी एंटरप्रायझेस, धायरीफाटा, सिंहगड रोड, पुणे येथे छापून सगुणा चॅरिटेबल ट्रस्ट, ७, माधव-लक्ष्मी अपार्टमेंट, २०७९, सदाशिव पेठ, विजयानगर कॉलनी, पुणे. ४११०३० येथे प्रसिद्ध केला.

(या अंकातील मतांशी संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही.)

# सगुणा

## संपादकीय

### ...पण लढलंच पाहिजे

क्रांतिज्योती सावित्री आणि महाराणी कुणबी जिजाऊ यांच्या जन्मदिनानिमित्त सगुणाच्या तमाम वाचकांना शुभेच्छा! नवीन २०१५ हे वर्ष सर्वांना भानावर ठेवो. जागृत अवस्थेत तुम्ही सर्वजण इतरांच्याही सुखदु:खात सामील होवोत. आपल्या सभोवताली घडणारी प्रत्येक घटना-प्रसंग तुम्हाला प्रतिक्रिया द्यायला भाग पाडो. नवीन वर्षात आपला सर्वांचा हस्तक्षेप खूप गरजेचा आहे. तीन जानेवारीच्या महिला मुक्तिदिनानिमित्त क्रांतिज्योती सावित्रीबाईंच्या कार्याचे स्मरण करून झालेच आहे. त्या त्या परिस्थितीत धैर्याने उभी राहणारी स्त्रीशक्ती-काळालाही कोडे घालणाऱ्या या असामान्य दूरदृष्टीला व धाडसाला शतश: प्रणाम!

शांतपणाने चार भिंतीत बसून संसार चालवला असता तर प्रचंड सुख लाभलंच असतं सावित्रीबाईंना! पण सुखाला पाठ दाखवून दगडाचे-शेणाचे गोळे अंगावर घेतले. महात्मा फुले आणि फातिमा शेख यांच्या साथीने सावित्रीबाईंनी भारतातील पहिली स्त्री-शाळा काढली. सावित्रीबाई आपल्यासारखीच सामान्य बहुजन स्त्री, भारतातल्या प्रत्येक शिक्षित स्त्रीची शिक्षिका बनली. ज्ञानदात्री झाली. हे मान्यच करायला लागेल ना. सावित्रीबाईंनी केवढा त्रास, जुलूम सहन केला. पण त्या या ध्येयापासून मागे हटल्या नाहीत. या घटनांतून, इतिहासातून येणारे धागे पकडूनच 'सगुणा'ची वाटचाल चालू आहे.

१२ जानेवारीला जिजाऊंची स्मृती साजरी होते. या रयतेच्या राणीची बहुजन कुणबी विचारधारा आपण समजून घेतली तर त्यातलं अभ्यासू-कष्टाळू-धाडसी -दूरदृष्टीने परिपूर्ण व्यक्तित्व आपल्या अनेक समस्यांचं समाधान करेल, आपल्याला मार्गदर्शन करेल. इतिहास बरोबरच कळला पाहिजे. या देशातल्या भौगोलिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक व्यवस्थांचा इतिहास परत परत तपासला पाहिजे व तो खराखुराच समजून घेतला पाहिजे.

मागचे दिवस व येणारे दिवस या दोघांचा मेळ घालणं दिवसेंदिवस कठीण होत जाणार आहे. स्त्री-विश्वापुढील आव्हाने येणाऱ्या काळात खूपच तीव्र होत जाणार आहेत. संपूर्ण विश्व बाजाराची गुलामगिरी स्वीकारलेल्या मन:स्थितीत आहे. व्यक्तीला वस्तूंप्रमाणेच मोलभावाला मांडून ठेवलं जातंय! राज्यकर्ते व्यापारी तर जनता भिकारी, अशीच अवस्था निर्माण होताना दिसते आहे. यामध्ये स्त्री काय किंवा पुरुष काय दोघांनाही अनेक समस्यांना सामोरे जावे लागणार आहे.

मूल्य-विचार-माणुसकी या तत्त्वांनी युक्त असणारी समांतर चालणारी विचारधारा अराजकामध्येही समतोल साधत असे, परंतु आजच्या तथाकथित भांडवली विकासाच्या वेगात अमूल्य गोष्टीही भोवऱ्यात गटांगळ्या खाताना दिसत आहेत. राज्यसत्तेवरचा अंकुश संपत्तीच्या राशीखाली बोथट होऊन बसला आहे. धर्मसत्ता धर्मांधतेने आंधळ्या व क्रूर झालेल्या आहेत. या परिस्थितीमध्ये मूर्खपणाचे चोचले परवडणारे नाहीत. गैरसमजाने-भोळेपणाने सुखाचा भास व कल्पनांच्या मागे न धावता

खंबीरपणाने परिस्थितीचे सखोल मूल्यमापन झाले पाहिजे. घडणाऱ्या घटनांची कारणमीमांसा करत, तिच्या मुळाशी जात परिस्थितीवर कशी मात करता येईल याचा आपल्याला संघटितपणे विचार करावा लागणार आहे. व्यवस्थेच्या केंद्रस्थानी माणूस-निसर्ग कसा आणता येईल हे पाहिले पाहिजे. यासाठीचा लढा खूप कठीण व दीर्घ पल्ल्याचा आहे, पण लढलं पाहिजेच. लढण्याशिवाय आता गत्यंतर नाही.

आपली समतावादी संतपरंपरा, महात्मा जोतिबा फुले, महात्मा गांधी या सर्वांचे प्रेरणादायी व मार्गदर्शनपर विचारधन बहुजन स्त्रीवादाला नक्कीच मार्ग दाखवेल. बहुजन स्त्रीवाद हा या परिस्थितीत संघटितपणे उभा राहिला तर आपला लढा किंवा संघर्ष सकारात्मकतेकडे निश्चितपणे वाटचाल करेल. मनुष्यत्वाची राखण आता याच माध्यमातून शक्य आहे. वात्सल्यशौर्य आणि भगिनीभाव सध्याच्या या क्रूर परिस्थितीला तोंड देऊ शकतो. या सर्व राखेखालच्या ठिणग्या नवज्ञानाने प्रज्वलित केल्या पाहिजेत. हे सर्व शक्य आहे. त्यासाठी इच्छाशक्ती व चिकाटी बाळगून असणारी बहुजन स्त्री पूर्ण ताकदीने उभी राहिली तर अनेक संघर्ष निर्णायक परिस्थितीला येऊ शकतात.

गावकुसापासून ते महानगरातल्या झोपडपट्ट्यांपर्यंत फूटपाथवर सगळीकडे विखुरलेल्या बहुजन स्त्रियांना हळूहळू संघटित करून बहुजन स्त्रीवादाच्या विचाराखाली एकत्र आणण्याचा प्रयत्न अथकपणे व धीराने करायला हवा. परिस्थितीने पिडलेल्या, व्यवस्थेने नाडलेल्या या स्त्रियांपर्यंत शिक्षण, कौशल्य प्रशिक्षण, आरोग्याच्या सोयी, सुरक्षितता या गोष्टी व्यवस्थेच्या माध्यमातून पुरवणे गरजेचे आहे. व्यवस्थेवरचे अंकुश यासाठी सतर्क ठेवले पाहिजेत. स्त्रियांचे शिक्षणाचे व आरोग्यांचे व सुरक्षिततेचे प्रश्न खूपच गंभीर व अपूर्ण आहेत. यासंदर्भात काम करण्याची प्रचंड गरज आहे. त्यांच्या प्रश्नांची जाणीव त्यांना होऊन त्या लढायला उभ्या राहणे महत्त्वाचे आहे.

नवीन वर्ष प्रचंड धावपळीचे जाणार आहे. स्त्रियांना एकमेकीच्या साहाय्याची गरज असणारच आहे. 'सगुणा'ही यामध्ये सदैव आपल्यासोबत राहणार आहे.

म्हणूनच -

खणूया इतिहास
आपण आपला
लावू या तपास
कुठे गेली राधा?
कुठे गेली खदीजा?
कुठे जानाई?
कुठे मुक्ताई?
कुठे महदंबा?
कुठे अक्कहम्मा देवी?
कसे सुंध बैसले,
सारे महाकवी?
गाडून टाकले प्रकृतीचं गाणं
मिळवू परत निऋतीचं रान
ज्ञानाची सारी गठूडी खोला
एक मुकानं 'बहुजन स्त्रीवाद' बोला
तिचं ग्यान अफाट
पोचला थैयथैयाट,
तिचा गोंधळ भारी
सरसावले कारभारी
तिची ज्योत अखंड
चला मशाली पेटवा
देहादेहांत 'बहुजन स्त्रीवाद' जागवा
वसा घेऊनच टाका
उतू नका मातू नका
पुरा मातीत गाडगं
पिक ज्ञानाचं घेऊ
लय झाली उपकार बुद्धी
बघा आता बहुजन वृत्ती
बास झालं
जाऊ दे जाऊ दे आता
आपलं निशान लावू दे

■

## लेख

# एक अपारंपरिक, फेमिनिस्ट मित्र राजीव कालेलकर

**डॉ. कुंदा प्रमिला नीळकंठ**

३१ डिसेंबर २०१४ रोजी डाव्या चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते कॉम्रेड राजू कालेलकर यांचे निधन झाले. कुंदा प्र. नी. यांनी सांगितलेल्या कालेलकर यांच्या काही हृद्य आठवणी येथे 'सगुणा'च्या वाचकांसाठी देत आहोत.

३१ डिसेंबर २०१४ रोजी पहाटे आमचा स्त्रीवादी मित्र राजीव कालेलकर गेला. गेले वर्षभर तो अन्ननलिकेच्या कॅन्सरने आजारी होता. मे २०१४ मध्ये त्याचे पहिले ऑपरेशन झाले तेव्हा आम्हाला वाटायचे, हा आजार बरा होण्यासारखा आहे, होईल राजू बरा. पण तसे झाले नाही. महिन्याभरापूर्वी त्याचा आजार जेव्हा खूप बळावला तेव्हा मात्र वाटले की गेल्या वर्षभरापासून 'हरिती प्रकाशनाने' प्रकाशित करायचे ठरवलेले राजूचे पुस्तक लवकरात लवकर छापून यायलाच हवे. डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात त्याचे दुसरे ऑपरेशन झाले तेव्हा डॉक्टरांनी बॉम्बच टाकला, म्हणाले, आता राजू काही दिवसांचाच सोबती. त्याला घरी जाऊ देत, शांतपणे डोळे मिटू देत! हे कळताच पुण्याच्या अनिल जायभाये, दीपक कसाळे, विलास सोनवणे यांनी प्रेसमध्ये धाव घेतली आणि पुस्तक छपाईला वेग दिला. अखेर ३० डिसेंबरला राजूच्या घरी प्रकाशनासाठी संध्याकाळी राजूचे सगळे जुने-नवे मित्र भेटलो. ठरवले होते चेहऱ्यावर दु:ख आणायचे नाही. राजूला आनंद वाटेल असे बोलायचे आणि त्याच्या चेहऱ्यावर हास्य फुलवायचे आणि तसेच घडले त्यांच्यासोबतच्या आमच्या आठवणी ऐकता ऐकता तो खूप खुलला, हसला. आम्ही निरोप घेऊन आपापल्या घरी परतलो आणि पहाटे त्याच्या घरून फोन आला, कळले की, राजू गेला.

राजू हा एक पुरुषमित्र आहे असं कधी जाणवलेच नाही. एखाद्या जीवाभावाच्या मैत्रिणीसारखा वाटायचा तो. त्याच्याशी मनातलं सगळं दिलखुलासपणे बोलता यायचं. मला आठवतं त्याची आणि माझी भेट त्याच्याच घरी १९८० साली झाली. त्याचं असं झालं की मी मुंबईतल्या समग्र सडक नाटक चळवळीने केलेलं 'बिगी बिगी मार वल्ह' हे सडक नाटक पाहिले होते. आणीबाणीच्या काळात लोकशाही हक्कांवर जी गदा आणली गेली होती, त्याविषयी असलेले हे सडक नाटक मुंबईत ठीकठिकाणी केले जात होते. त्या नाटकानंतरच्या झालेल्या चर्चेत मी भाग घेतला तेव्हा त्या मंडळींनी विचारले की तुझे विचार स्त्रीमुक्तीवादी दिसतायत तू आमच्या स्त्रीमुक्तीविषयीच्या दुसऱ्या नाटकात काम करशील का? मी लगेच 'हो' म्हटले. मी विचारलं 'कोणी लिहिलंय?' तर कुणी तरी म्हणाले आमच्यात कोणी एकच लेखक नसतो तर आम्ही सामूहिकरित्या नाटकं लिहितो आणि बसवतो. फक्त राज्यनाट्य स्पर्धेत आम्ही एखाद्या नाटककाराने लिहिलेली नाटकं बसवतो. मला पहिला धक्का बसला. 'सामूहिकरित्या नाट्यलेखन? कसं शक्य आहे? त्यात काय सर्जनशीलता असणार? अशी नाटकं तर प्रचारकीच असणार! नाटक लिहिण्याच्या प्रक्रियेत सामील करून घेण्यासाठी त्या ग्रूपमधल्या एकाने मला राजीव कालेलकरचा पत्ता देऊन त्याच्याकडे यायला सांगितले. दुसऱ्या दिवशी मी ऑफीस सुटल्यावर बरोब्बर सहा वाजता राजीव कालेलकरच्या घरी पोहोचले. सेरेब्रल पाल्सीमुळे दोन्ही पायाने अधू असलेल्या राजूने माझे हसत हसत स्वागत केले. त्यात एक प्रकारचा आपलेपणा होता, गप्पागोष्टी करण्याचा उत्साह होता.

नाटकाच्या ग्रुपमधले इतर लोक जमा होईपर्यंत खूप वेळ असायचा. त्यामुळे गच्चीवरच्या त्याच्या अभ्यासिकेत आम्ही गप्पा मारत बसलो. त्या दरम्यान माझ्या मनात आलेले सगळे प्रश्न त्याला सांगून टाकले. त्या साऱ्या प्रश्नांची उत्तरं देण्याचा त्याचा उत्साह पाहून मला जाणवले की हा माणूस अगदी आपल्यासारखाच विचार करतो. त्याचं प्रचंड वाचन आहे. मी उल्लेखिलेल्या सगळ्या लेखकांची अगदी रा. भा. पाटणकरांच्या सौन्दर्यशास्त्रापासून ते गौरी देशपांडेंचे सगळे कथासंग्रह त्याला माहीत होते. तेव्हापासून आमची चांगलीच गट्टी जमली. त्यानंतर दररोज चर्चा चालायच्या. प्रत्यक्ष नाटक लिहिण्यापेक्षा चर्चाच अधिक. त्या वेळी मला अनेक प्रश्न पडायचे. कारण एक तर मी 'एमए वुईथ मराठी', त्यामुळे पूर्णपणे मध्यमवर्गीय ब्राह्मणी साहित्य-संस्कृतीचे संस्कार डोक्यात फिट्ट बसलेले आणि दुसरे नुकतीच सरकारी नोकरी सोडून एका अमेरिकन ऑईल कंपनीत नोकरीला लागलेले. त्यामुळे कुटुंब आणि नातेवाईकांना कधीच परिचित नसलेली इंग्रजाळलेल्या वागणुकीची तऱ्हा आणि संस्कृती अंगीकारण्याची मला जबरदस्त हौस! त्यामुळे माझ्याकडून ठरावीक मध्यमवर्गीय साच्याचे भरपूर प्रश्न यायचे. ग्रुपमधले कुणीतरी माझ्यावर मध्येच शिक्कामोर्तब करूनही टाकायचे, ही बुर्ज्वा आयडीयोलोजी आहे ! माझा चेहरा पडायचा, अस्वस्थ वाटायचं. राजूला ते कळायचं. तो प्रेमळपणे पेशंटली माझ्या बोलण्याचे स्वरूप काय आहे ते समजावून सांगायचा.

माझ्यासारख्या अनेकांचा मार्क्सवादी विचारांचा पाया पक्का करण्याचे श्रेय राजूला जाते. कारण आमची गाडी नेमकी कुठे अडकून राहिलीय हे त्याला बरोब्बर समजायचे. सोपी सोपी पुस्तकं तो मला वाचायला द्यायचा. रोझा लक्झेम्बर्ग असो वा अलेक्झांद्रा कोलांताय, त्यांची मराठी आणि इंग्रजीतली पुस्तकं तो आवर्जून माझ्यासाठी काढून ठेवायचा आणि दुसऱ्या दिवशी मी लवकर आल्यावर देऊन चर्चाही करायचा. जगातल्या श्रमिक स्त्रियांच्या हक्काचा जाहीरनामा लिहिणारी क्लारा झेटकीन आणि श्रमिक स्त्रियांना बाळंतपणाची रजा मिळवून देणारी अलेक्झांद्रा कोलांताय आहे हे मला पहिल्यांदा राजूनेच सांगितलं. मराठी स्त्रीलेखिकांच्या साहित्याच्या निमित्ताने स्त्रीपुरुष नात्याविषयी माझ्याशी निर्मळ आणि मोकळेपणाने चर्चा करणाराही राजूच होता. त्याने आणि सुजाता गोठोस्करने स्त्रियांच्या प्रश्नावर 'जाळण' नावाचे नाटकही लिहिले होते. तो म्हणायचा तुमच्याशी चर्चा केल्यामुळे माझ्या स्त्रीमुक्तीबद्दलच्या जाणिवा समृद्ध होतात.

राजूच्या घरी जमणारे लोक कम्युनिस्ट पक्षांच्या प्रवाहांबाहेरचे, 'मागोवा' या मार्क्सवादी अभ्यास परंपरेतले होते. म्हटलं तर पारंपरिक कम्युनिस्टांपेक्षा वेगळे, खूप जास्त ओपन, आणि लवचिक अशा विचारांचे होते. राजीव कालेलकरसारखाच मागोवा परंपरेचा वारसा मानणारे भारत पाटणकर, अनिल सावंत, सुधाकर बोरकर, शहाद्याच्या आदिवासींमध्ये, श्रमिक संघटनेत काम केलेले रंजना कान्हेरे, विक्रम कान्हेरे, तर 'सखाराम बाईंडर'च्या काळात आधुनिक व प्रायोगिक नाट्यपरंपरेचा वसा घेतलेले, अविनाश कदम, क्रांती बांदेकर आणि शिवराम सुखी हे होते. राजूसहित या सगळ्यांना जवळ आणणारा, घट्ट जोडणारा एक जबरदस्त धागा होता, तो म्हणजे ढसाळांपासून सुरू झालेली प्रस्थापितविरोधी बंडखोर कविता, लिटिल मॅगेझीनची बंडखोर साहित्य चळवळ. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतून फुललेली आधुनिक लोककलेची परंपरा आणि पुरुषप्रधानतेचा ढाचा बदलला पाहिजे असं मानणारी आणि त्यासाठी रोजच्या आयुष्यात धोके पत्करण्याची हिम्मत ठेवणारी स्त्रीवादाची मांडणी. थोडक्यात सांगायचं तर पर्यायी कला, साहित्य, नाटक, संगीत आणि समतावादी फुले-आंबेडकरवादी विचार हा तो धागा होता. या सगळ्या विषयाचं राजूने प्रचंड वाचन केलेलं होतं.

राजूच्या घरी चाललेली सामूहिक नाट्यलेखनाची प्रक्रिया जवळ जवळ एक वर्षभर चालली. हे म्हणजे जरा अतीच झालं! कारण राजू कालेलकरला गप्पा मारण्याची भारी हौस. कित्येकदा चर्चा भलतीकडेच भरकटत जायच्या. पण खरंतर ते भरकटत जाणे अजिबात चूक

नव्हतं, कारण ती एका संक्रमण काळातली गरजही होती. ती नुसती भरकटलेली चर्चा नसायची तर एक सांस्कृतिक परिवर्तनाची प्रक्रिया होती. वैकल्पिक संसकृतीविचाराची सैद्धान्तिक तयारी होती. आणीबाणीनंतर निर्माण झालेल्या वादळाची घडी बसवण्याचा तो प्रयत्न होता. नुकताच 'प्रतिशब्द ८०' हा वैकल्पिक संसकृतीचा महोत्सव होऊन गेला होता. प्रस्थापितांना अनेक प्रश्न विचारले जात होते. डाव्या पक्षांची तोडमोड झाली होती. मुख्य म्हणजे 'मागोवा' तुटलं होत. ८० च्या दशकात पर्यायी कला-साहित्य, संस्कृती संदर्भात जी प्रचंड उलथापालथ घडून येत होती, त्याचा मागोवा घेत पारंपरिक फॉर्मसना झुगारून देत, नव्या प्रक्रियेची, पर्यायी कलेची परंपरेची सैद्धान्तिक मांडणी करणारे ते विचारमंथन होते. या विचारमंथनातून आणि नव्या मुशीत घडलेले विचारच राजीव कालेलकर आणि मित्रांनी पुढे विस्ताराने मांडत नेले.

नंतर आम्ही सारे वेगवेगळ्या दिशांना पांगलो, थोडेफार मतभेद झाले तरी ८०च्या दशकातल्या कला आणि संस्कृतीच्या संक्रमण काळात तयार झालेली 'वैकल्पिक विचारांची' बैठक, पुढच्या काळात आम्हा सर्वांनाच ठामपणे उभं करून गेली. आमच्यापैकी प्रत्येकाकडून वेगवेगळ्या फॉर्ममध्ये पर्यायी सांस्कृतिक मांडणी करण्याचा प्रयत्न झाला. मला आठवते, गणपती उत्सवाचे मोठे स्तोम माजू लागले होते. पर्यायी उत्सव आणि अंधश्रद्धा दूर करण्यासाठी काहीतरी करूया म्हणून आम्ही राजूच्या घरी पुन्हा एकदा जमलो होतो. तेव्हा आदिम टोळीबद्ध समाजातील गणपतीची कुळकथा सांगूया असे राजू म्हणाला. आम्ही जयंत गडकरी आणि डी. डी. कोसंबींची पुस्तके काढून त्यातले उतारे लिहून चित्रमय पोस्टर प्रदर्शन तयार केले. गणेशोत्सव हा 'गणराज्य दिवस' साजरा करायचे ठरवले. क्रांती बांदेकर आणि राजूने गणपतीची कुळकथा सांगणारे छोटेसे सडक नाटकही लिहिले ते नाटक व पोस्टरप्रदर्शन साऱ्या महाराष्ट्रभर फिरले.

राजूने ९० च्या दशकात 'सकल' साहित्य समेलनाच्या स्वरूपात पर्यायी मांडणी केली. थोड्या मतभेदातून विद्रोही संमेलनाची मांडणी भारत पाटणकरांनी केली, मीही स्वत: दलित बहुजनवादी स्त्रीवादाची मांडणी करू लागले. पुढे श्रमिक मुक्ती दलात राजूने पर्यायी सांस्कृतिक प्रश्नावर, स्त्रीमुक्तीच्या विविध भूमिकांवर राजूने भाष्य केले, लिहीले. ९० नंतर युवा भारत, विलास सोनवणे आणि त्याने चालवलेली मुस्लीम ओबीसींची चळवळ, अनेक आंबेडकरवादी कवी, मावा (मेन अगेन्स्ट व्हॉयलेन्स एँन्ड अब्यूज) ही स्त्रीवादी विचारांना मानणारी पुरुषांची संघटना स्थापन करण्यात राजूचा पुढाकार होता. पुरुषांच्या स्त्रियांबाबत संवेदनशीलता वाढायला हवी असं राजूचं प्रामाणिक मत होतं. त्यादृष्टीने मावाचा 'पुरुष स्पंदन' हा अंक काढण्यासाठी खूप मेहनत घेतली. स्त्रीमुक्ती संघटनेच्या प्रेरक ललकारीत लेखन तसंच 'परिवर्तनाच्या वाटसरू' मध्ये अधूनमधून लेखन करीत राहिला.

राजूचा चळवळीत नव्याने आलेल्या अनेक तरुण कवी, कलावंताशी सातत्यपूर्ण संवाद असायचा. अत्यंत माणुसकीपूर्ण संवाद हेच राजूचं वैशिष्ठ्य. त्याला गप्पा मारायला सतत माणसं हवी असायची. त्यामुळे प्रचंड मोठ्या परिवाराशी राजूचे सौहार्दाचे संबध होते. अनेक वेळा खूपवेळ फोनवर बोलणाऱ्या राजूला थांबवून मला कामाला जायचंय असं सांगितलं की तो हिरमुसायचा. मग आपल्या मनाला वाईट वाटून आपण परत फोन केला की स्वारी खूष. गप्पांच्या ओघात राजूने स्वतःला बदलण्यासोबतच आम्हाला सर्वांना स्वत:मध्ये बदलाची प्रक्रिया घडवायला भाग पाडले आहे.

असा हा परममित्र राजू एक चालता-बोलता संगणक होता. त्याच्या अपंगत्वाच्या काही मर्यादांमुळे चळवळीतले कित्येक लोक त्याच्या घरी बसून योजना आखायचे. चर्चेच्या ओघात थोडा उशीर झाला तरी त्यांच्या जाणिवा सर्वांगाने विस्तारलेल्या असायच्या. त्यामुळे एवढंच सांगायचं आहे की, या सर्वसमावेशक जाणिवांच्या रूपात राजू आमच्या सोबतच आहे. नेहमीच राहील.

('प्रेरक ललकारी'च्या सौजन्याने)

■

## लेख

# स्त्रिया गुलामच राहणार...

**कॉम्रेड विलास सोनवणे**

---

१९८९ साली व्ही. पी. सिंगांच्या नेतृत्वात एका बाजूंनी भाजप तर दुसऱ्या बाजूंनी डाव्या आघाडीच्या पाठिंब्यावर सुरू झालेली आघाडी सरकारांची परंपरा मोडीत काढत नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात पुन्हा एकदा एक पक्षीय बहुमतातल्या सरकारची सुरुवात सहा महिन्यांपूर्वी झालेली आहे. मोदी सरकारमध्ये एनडीएमधल्या घटक पक्षांचे मंत्री असले तरी त्यांच्या नसण्याचा व असण्याचा सरकारच्या स्थिरतेवर कुठलाही नकारात्मक परिणाम होण्याची पुसटशीदेखील शक्यता नाही. त्यांचं असणं मोदींना दोन कारणांसाठी हवं आहे. एक सत्तेत नसल्यामुळे त्यांच्या त्यांच्या राज्यात केंद्र सरकारच्या विरोधात काहीही गडबड करण्याच्या शक्यता कमी होतात. यापैकी बहुसंख्य पक्ष हे प्रादेशिक आहेत. रामविलास पासवान वगळता त्यातील बहुसंख्य पक्ष दक्षिणेतील आहेत. दक्षिणेमध्ये कर्नाटक वगळता संघ परिवाराला तसेच बीजेपीला अजूनही हात-पाय पसरता आलेले नाहीत. या घटक पक्षांना केंद्र सरकारमध्ये वाटा देऊन त्यांच्याच पाठीवर स्वार होत संघ परिवाराला व बीजेपीला दक्षिणेत पसरायचे आहे. मोदींच्या मनात आणखी एक गोष्ट आहे, ती म्हणजे बीजेपीतल्या कट्टर संघवाल्यांना घटक पक्षांच्या आधाराने वेळ पडल्यास गप्प बसवायचे आहे. अशारितीने पक्षांतर्गत तसेच पक्षाबाहेरील विरोधाचे व्यवस्थापन करण्याची मोदींची योजना आहे. त्या अर्थाने वरवर पाहता तांत्रिकदृष्ट्या हे राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार असले तरी प्रत्यक्षात मात्र ही मोदींची निरंकुश सत्ता आहे.

इंदिरा गांधींचा खलिस्तानवादी शक्तींनी देहान्त केल्यानंतर अशाप्रकारे निरंकुश सत्ता मिळालेले दुसरे सरकार १९८४ नंतर केंद्रात सत्तेवर आलेले नाही. इंदिरा गांधींच्या देहांतानंतर ऐतिहासिक तीन चतुर्थांश जागा मिळवून राजीव गांधी सत्तेवर आले होते. परंतु त्यांना सत्ताभान येईपर्यंत भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली त्यांचे सरकार दबून गेले व १९८९ साली त्यांचा पराभव झाला.

राजीव गांधींनी इंदिरा गांधींच्या सोव्हिएत युनियनकडे झुकलेल्या धोरणांपासून फारकत घेत त्यांच्या अगोदरच्या कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेपासून फारकत घेत सत्तेची दिशा तंत्रज्ञानप्रवण व भांडवलप्रवण धोरणांकडे वळवली. परिणामी, जागतिक पातळीवर भांडवलाच्या एकात्मिकी-करणाकडे सुरू झालेली जागतिक भांडवलशाहीची वाटचाल सुकर व अधिक गतिमान झाली.

राजीव गांधी सरकारच्या पाडावानंतर सत्तेवर आलेल्या व्ही. पी. सिंग सरकारने मंडल आयोगाच्या काही शिफारशी मान्य करून सामाजिक अस्मितांच्या लढाया अधिक प्रखर व गतिमान केल्या. याच काळात बाबरी मशिदीच्या मुद्यावर एकीकडे संघ परिवाराने इंदिरा गांधींच्या काळात १९८३ साली त्यांनी सुरू केलेले धर्मांध राजकारण अधिक प्रखर व गतिमान केले. एकीकडे संघपरिवाराचा हिंदुत्वाचा अजेंडा तर दुसरीकडे लालू प्रसाद यादव, मुलायमसिंग, कांशीराम-मायावती यांचा सामाजिक समतेचा अजेंडा अशी गृहयुद्ध सदृश्य परिस्थिती भारतामध्ये निर्माण झाली होती. या गृहयुद्धामुळे केंद्रात व राज्यात सत्तेवर आलेल्या सगळ्याच पक्षांच्या सरकारांची विकासाची दिशा मात्र एकच होती. ती म्हणजे भांडवली विकासाची, उत्पादनातून मानवी श्रमाला हद्दपार करणारी वा मानवी श्रमाला नाकारणारी तंत्रज्ञान प्रवण दिशा होती.

भारतीय उपखंडातील स्त्रिया या जाती-व्यवस्थेतील

मनुष्य समाजपूरक प्रत्यक्ष शेती करणाऱ्या किंवा शेती करण्यासाठी पूरक अशा तंत्रकुशल समाजातील स्त्रिया होत्या व आहेत. इंग्रजांनी त्यांच्या लुटीच्या उद्देशाने अठराव्या शतकाच्या उत्तरार्धापासून आखलेल्या विकासाच्या धोरणांमुळे स्त्रियांचे शेती उत्पादनातील श्रमाचे स्वरूप हळूहळू बदलत गेले वा उत्पादनप्रक्रियेतून त्यांचे श्रम हद्दपार झाले. ब्रिटिशांनी गंगेचे खोरे वगळता उर्वरित भारतातील बहुसंख्य शेती कापसाच्या लागवडीखाली आणली व गंगेच्या खोऱ्यातील विशेषत: आत्ताचा उत्तर बिहार व बंगाल (बांग्लादेशसह) हा नीळ व ज्यूट (ताग-अंबाडी)च्या लागवडीखाली आणला. उत्तर प्रदेशाचा पूर्व भाग त्यांनी अफूच्या उत्पादनाखाली आणला. परिणामी भारतातील बहुसंख्य शेतीची मानव समाजासाठी उत्पादन या दिशेऐवजी जागतिक बाजारासाठी उत्पादन ही दिशा आखली गेली. परिणामी शेती व शेतीपूरक उत्पादनातील तंत्रकौशल्यावर आधारित स्त्री-पुरुषांचे श्रम नाकारले गेले व या श्रमावर आधारलेल्या सामाजिक रचना, नातेसंबंध व अस्मितांमध्ये बदल घडण्यास सुरवात झाली. या बदलांमुळे निर्माण होणाऱ्या नव्या उद्योगामध्ये, या उद्योगाभोवती या उद्योगांशी संबंधित, या उद्योगांमुळे निर्माण झालेल्या शहरांशी संबंधित नव्या सामाजिक रचनांची घडण सुरू झाली. या नव्या घडणीमध्ये स्त्रियांच्या तुलनेत पुरुष वेगाने व मोठ्या प्रमाणात समाविष्ट झाले. आपण अकुशल ठरत चालले आहोत, याचं भान नव्या व्यवस्थेने स्त्रियांना फार काळपर्यंत येऊ दिले नाही. नव्या तंत्रज्ञानाच्या आधाराने नव्या यंत्रावर काम करणारा पुरुष कमावता ठरत गेला व जुनी कुटुंबव्यवस्थेऐवजी नवी पुरुषकेंद्रीत कुटुंब व्यवस्था आकाराला येऊ लागली.

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धापासून सुरू झालेली ही भांडवली विकासाची प्रक्रिया खनिज तेलाचे शोध लागेपर्यंत संथ होती. आधी खनिज तेलामुळे व नंतर विजेमुळे यंत्रांची गती जशी वाढत गेली. त्यानुसार जुन्या सामाजिक रचनेचं विस्कटणं व नव्या व्यवस्थेचं घडणं अधिकाधिक गतिमान होत गेलं.

पहिल्या महायुद्धाच्या शेवटी शेवटी रशियात कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वात झालेल्या कामगारवर्गीय क्रांतीने या भांडवली व्यवस्थेसमोर मोठे आव्हान उभे केले. उत्पादन सामूहिक असेल तर नफा मात्र खासगी का? असा प्रश्न विचारतानाच स्त्रियांचे श्रम व समाजातील स्थान पुरुषांचे श्रम व समाजातील स्थानापेक्षा दुय्यम का? पुरुष जर व्यक्ती असतील तर स्त्रिया वस्तू का? असे प्रश्न विचारत समान कामाला समान दाम असला पाहिजे व ते काम करणाऱ्या सर्व स्त्री-पुरुषदेखील समान मानले पाहिजेत, असा आग्रह रशियन क्रांतीने धरला.

रशियातील क्रांतीमुळे जागतिक भांडवलशाहीच्या चौखुर उधळणाऱ्या रथाला चांगलाच ब्रेक लागला. याचे पडसाद भारतीय उपखंडातदेखील उमटले. भांडवलशाहीला व भांडवलाच्या आधारावर उभ्या राहिलेल्या साम्राज्याला पराभूत करता येऊ शकते, हा आत्मविश्वास जगातल्या सगळ्याच कष्टकरी स्त्री-पुरुषांच्या मनामध्ये जागवला गेला. भारतीय उपखंड इंग्रजांची वसाहत होती. 'dogs and Indian's are not allowed' (कुत्री व भारतीय लोक यांना प्रवेश नाही) अशाप्रकारच्या पाट्या असलेले इंग्रजांचे क्लब सगळ्या मोठ्या शहरांमधून तसेच दार्जिलिंग, सिमला, मसूरी, नैनीताल, महाबळेश्वर, खंडाळा, उटी इत्यादी शहरांमध्ये होते. तिथे इथल्या राजे-राजवाड्यांना तसेच टाटा-बिर्ला नाही प्रवेश नव्हता. गांधीजींकडे रेल्वेच फर्स्ट क्लासचे तिकिट असूनदेखील दक्षिण आफ्रिकेत त्यांना सामानासकट रेल्वेच्या डब्यातून इंग्रजांनी हाकलून दिले होते. रशियन क्रांतीने वसाहतींमधली ही परिस्थिती लगेच बदलली नाही. परंतु जागतिक भांडवलशाहीला उदारमतवादी चेहरा, मानवी चेहरा धारण करायला हळूहळू व निश्चिंतपणे भाग पाडले.

इंग्रजांनी भारतात आणलेल्या नव्या बाजारकेंद्रीत उत्पादनव्यवस्थेने शेती उद्योगात श्रम करणाऱ्या स्त्री-पुरुषांमध्ये एक परात्मकतेची भावना मूळ लागली. मानवकेंद्रीत शेती उत्पादनामध्ये खेड्यामधल्या सगळ्याच जाती परावलंबी होत्या. परस्परपूरक होत्या. परस्परांच्या आधाराने होत्या. त्यांच्यामध्ये मतभेद वा विरोधाची भावना असली तरी त्या उत्पादन व्यवस्थेमध्ये ती भावना शत्रूभावी होईल. यासाठीचा पैस नव्हता. कारण आपण ज्यासाठी कष्ट करतो त्याचं फलित, उत्पादनाचं वितरण, त्याची उपयुक्तता-विनियोग हे तुमच्या डोळ्यांसमोर होतं. शेतकरी स्त्री-पुरुषाला माहीत होतं त्यांनी पिकवलेल्या पिकांचे वाटेकरी कोण आहेत. वाटेकरी कारागिराला माहीत होतं की, त्याने निर्माण केलेल्या अवजारांचा वापर कोण करणार आहे, कुठे करणार आहे.

इंग्रजांनी शेती कापसाखाली आणली. महाराष्ट्राच्या शेतात पिकणारा कापूस इंग्लंडमधील कापड गिरण्यांमध्ये जाऊ लागला. त्या गिरण्यांमध्ये तयार झालेलं कापड गावात येऊ लागले. शेतकऱ्याला माहीत नाही कापूस जातो कुठे? कापड येते कुठून? हा कापूस विकत घेणाऱ्या व कापड विकणाऱ्या व्यापाऱ्यांचे-सावकरांचे नवे वर्ग तयार होऊ लागले. हे सगळे नवे वर्ग उत्तर पेशवाईतल्या अराजकात इंग्रजांना मदत करणाऱ्या शेटजी-भटजी जातीतून आलेले होते. नव्या व्यवस्थेने आणलेली परात्मकता आणि नव्या भांडवली बाजारामुळे इथल्या शेतीकेंद्रीत व्यवस्थेतील कास्तकार व शेतीपूरक कारागीर जातींची झालेल्या दुरवस्थेचं चित्रण जोतिबा फुल्यांनी त्यांच्या 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथात केले आहे. या दुरवस्थेमुळे सगळा बहुजन समाज कसा अधिकच सामाजिक गुलामगिरीचा बळी झालेला आहे, याचे वर्णन जोतिबांनी त्यांच्या 'गुलामगिरी' या ग्रंथात केले आहे.

आपल्या समाजापासून, आपल्या उत्पादनापासून आलेल्या परात्मकतेची कारणे समजल्याशिवाय स्त्री-पुरुषांना विशेषत: स्त्रियांना ती नष्ट करता येणार नाहीत हे पक्के ठाऊक असल्यामुळे फुले १८४८ साली मुलींची पहिली शाळा सुरू करतात व त्या शाळेतल्या पहिल्या शिक्षिका म्हणून सावित्रीबाई व फातिमा शेख यांना साक्षर करून शिक्षित करतात. जोतिबा व सावित्रीबाई नंतर ज्या लोकांनी फुल्यांचा सत्यशोधकीय वारसा जपण्याचे दावे केले. त्यांनी फुल्यांचा सत्यशोधक समाज बेमालूमपणे ब्राह्मणेतर समाजामध्ये बदलला व शिकणे साक्षरतेपुरते संकुचित केले.

रशियन क्रांतीपूर्वी भारतीय उपखंडामध्ये निर्माण होत असलेल्या परिस्थितीला प्रतिक्रिया सुरू झालेल्या होत्या. एवढा मोठा खंडप्राय देश आपल्याला स्थानिकांच्या सहकार्याशिवाय व स्थानिकांमध्ये आधीपासून असलेल्या व नव्याने निर्माण झालेल्या त्रिवर्ण जात-वर्गातील लोकांना सत्तेत वाटेकरी करून घेतल्याशिवाय चालवता येणार नाही, हे इंग्रजांना माहीत होते. अशा वाटेकऱ्यांचा वर्ग १८५७ पासूनच त्यांनी इंग्रजी शिक्षित करायला सुरवात केली. ब्रिटिशांच्या पठडीत हा इंग्रजी साक्षर-शिक्षित वर्गात दोन विभाग होते. एक विभाग इंग्रजांच्या चष्म्यातून भारताकडे बघत जे जे भारतीय ते ते वाईट, जे जे इंग्रज ते-ते चांगले अशा विचारांचा झाला. त्यातील एक घटक स्वत:ला सुधारक म्हणवून घेऊ लागला. या सुधारकांनी इंग्रजी चष्म्याकडे पाहत पाहत भारतातील उच्चवर्णीय स्त्रियांच्या सुधारणांचा आग्रह धरायला सुरुवात केली. दुसरा प्रवाह आम्हीही इंग्रजांसारखे जेते आहोत, इंग्रजांच्या आधीच आम्ही हा देश जिंकला होता, इंग्रजांनी आम्हाला जेते म्हणूनच वागणूक दिली पाहिजे असे म्हणत या उच्चभ्रू जातवर्गाच्या 'स्वराज्या'ची मागणी केली व आमच्या स्वराज्याचा प्रश्न प्राथमिक महत्त्वाचा आहे. सुधारणांचा नाही असे म्हणत सुधारकांच्या विरोधात भूमिका घेतली. या दोन्ही प्रवाहांनी फुल्यांनी उपस्थित केलेल्या सत्यशोधक चळवळीशी आपले नाते जोडण्यास

नकार दिला.

जोतिबांच्या तथाकथित वारसदारांनी जोतिबांनी उपस्थित केलेल्या स्त्री-मुक्तीचा मुद्दा साक्षरतेमध्ये संकुचित केल्यामुळे त्रिवर्णातले तथाकथित सुधारक त्यांच्याशी आपले नाते जोडण्याचा दावा करत आले आहेत. इंग्रजी शिक्षितातील 'स्वराज्य'वादी हे स्वत:ला 'स्वराज्या'चा दावा करता करता 'स्वधर्म'वादीदेखील म्हणू लागले. पुढे जाऊन त्यांच्यातील काहींनी 'स्वधर्म'वादी असणे म्हणजे जे या देशात जन्माला आले व ज्यांची श्रद्धास्थाने या देशात आहेत ते म्हणजे 'स्वधर्म'वादी व त्यांनाच 'स्वराज्य' मागण्याचा अधिकार आहे, असे म्हणू लागले व असे म्हणता म्हणता त्यांनी भारताच्या फाळणीची बीजे रोवली.

रशियन क्रांती होत असताना भारतीय समाजामध्ये इंग्रजांनी आणलेल्या व्यवस्थेची समग्र चिकित्सा करत स्त्री-पुरुष समतेचा आग्रह धरणारा जोतिबा-सावित्री-फातिमा प्रणित सत्यशोधकीय विचारप्रवाह, राजा राममोहन रॉय-महादेव गोविंद रानडे-आगरकर असा सुधारकीय विचारप्रवाह, बंकीमचंद्र चटर्जी ते बाळ गंगाधर टिळक असा 'स्वराज्य' व 'स्वधर्म'वादी विचारप्रवाह असे तीन प्रमुख विचार प्रवाह उदयाला आले होते.

रशियन क्रांतीने जागतिक भांडवलशाहीला उदारमतवादी मानवी चेहरा धारण करायला भाग पाडल्याच्या काळात गांधी, आंबेडकर, सावरकर व मुज्जफर अहमदांच्या नेतृत्वात मार्क्सवादी विचारांचे आगमन झाले. यापैकी सावरकरांनी हिंदू धर्माला 'विवेकवादी' बनवण्याचा प्रयत्न करता करता 'हिंदुत्ववादाची' कास धरली. आंबेडकरांनी पूर्वाश्रमीच्या सर्व अस्पृश्य जातींसाठी 'दलित' अशी संकल्पना निर्माण करत त्यांच्या सत्तेतील सहभागाचा आग्रह धरायला सुरुवात केली. कम्युनिस्टांनी रशियन क्रांतीच्या प्रारूपाप्रमाणे भारतातील क्रांतीसाठी सर्व शहरांमध्ये औद्योगिक कामगारांना देशातील अनेक भागात शेतकऱ्यांना वर्ग म्हणून वर्गसंघर्षासाठी संघटित करायला सुरुवात केली. गांधीजींनी, 'मी सनातनी हिंदू आहे' असे जाहीर करीत, वैष्णव जन तो तेने कहियो। पीड परायी जानी रे।। अशी सनातनी हिंदू असण्याची व्याख्या करत इंग्रजी शिक्षणाच्या प्रभावाने, त्याच चौकटीत प्रतिक्रिया देत 'स्वराज्य' व 'स्वधर्म' या नावाने टिळकवाद्यांनी व सावरकरांनी केलेल्या हिंदुत्वाच्या कॅथलिक व्याख्येला आव्हान उभे केले. असे करीत असतानाच त्यांनी कम्युनिस्टांसमोर भांडवलशाहीने निर्माण केलेल्या परात्मकतेचं काय करायचं? असा प्रश्न उपस्थित करत स्वत:ला कोणताही दावा न करता फुल्यांच्या व त्याही आधीपासून भारतात अस्तित्वात असलेल्या बुद्धापासून, मध्ययुगातल्या भक्ती, सुफी आंदोलनापासूनच्या श्रमण परंपरेशी जोडून घेतले व इंग्रजी उत्पादनव्यवस्थेने ज्या उत्पादक जातींचे अस्तित्व धोक्यात आले होते, त्या सर्व शेतकरी व कारागीर जातींना चरख्याचे प्रतीक देऊन स्वत:शी जोडून घेत ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या विरोधात सगळे जातसमूह उभे केले.

गांधीजींनी उभ्या केलेल्या आव्हानाचे समग्र व समर्पक उत्तर वरीलपैकी कुठलाही प्रवाह देऊ शकला नाही ही वस्तुस्थिती आहे. पण इंग्रजांशी संगनमत करून ज्यांनी फाळणीची बीजे रोवली त्यांनाही गांधी रोखू शकले नाहीत. नथुराम गोडसे या माणसाने एकोणऐंशी वर्षांच्या निशस्त्र गांधी नावाच्या माणसाला गोळ्या घालून त्याचा खून केला हे खरे! पण त्याहीपेक्षा गांधींच्या खुनानंतर गांधींच्या ग्रामस्वराज्याच्या धोरणाकडे पाठ फिरवून ज्यांनी भांडवली विकासाचा मार्ग चोखळला, गांधींचा विरोध असतानाही ज्यांनी फाळणीला मान्यता दिली ते नेहरू, पटेल हे नथुरामापेक्षा मोठे गुन्हेगार आहेत. विकासाच्या नावाखाली १५ ऑगस्ट १९४७ पासून या देशात एकच गोष्ट घडली ती म्हणजे, सर्वसामान्य कष्टकऱ्यांच्या पैशांनी

व श्रमांनी भांडवलदार वर्गाचा, भांडवलाचा, भांडवलशाहीचा विकास सोव्हिएत युनियन अस्तित्वात असेपर्यंत व नंतर १९४९ च्या चिनी क्रांतीमुळे कामगारवर्गीय क्रांतीच्या धाकात असलेल्या जागतिक भांडवलशाहींनी कल्याणकारी राज्याची संकल्पना अंमलात आणण्याचे सोंग उभे केले. १९९१ साली सोव्हिएत युनियन नावाचा देश विकसित झाला. चिनी कम्युनिस्ट पक्षाने भांडवलशाही विकासाची कास धरली. त्यानंतर जागतिक भांडवल अनिर्बंध व निरंकुश झाले. मागील २५ वर्षांत विकसित झालेल्या तंत्रज्ञानाने उत्पादनातील मानवी श्रमाचा वाटा अतिशय कमी करून टाकला आहे. त्यामुळे या निरंकुशतेत कित्येक पटींनी वाढ झाली आहे. आता तर जमीन, पाणी, सर्व नैसर्गिक साधनं, सर्व आरोग्य सेवा, सर्व प्रकारचे शिक्षण या सगळ्यांचं बाजारीकरण झालं आहे. मानवी देहाचंही वस्तुकरण झालेलं आहे. या परिस्थितीमध्ये स्त्रिया कुठे आहेत? एकीकडे वस्तुकरणामुळे निर्माण होणारे आभासी स्वातंत्र्य आहे, असा व्यक्ती स्वातंत्र्याचा आभास करणं ही वस्तुकरण करण्याची पूर्वअट आहे.

या परिस्थितीला आव्हान देणारी कृती करेल अशी कुठलीही ताकद उभी राहणं आज जागतिक पातळीवर कार्यरत असलेल्या जागतिक भांडवली व्यवस्थेला नको आहे म्हणून राजकीय सत्ता निरंकुश असली पाहिजे, ही निरंकुशता संघपरिवाराने किंवा बीजेपीने आणलेली नाही. इंदिरा कॉंग्रेसच्या उदयानंतर म्हणजे १९६९ सालानंतर सर्व पक्षातील पक्षीय लोकशाही संपुष्टात येत गेली. १९८० चा जनता प्रयोग पक्षांतर्गत लोकशाहीचा शेवटचा प्रयोग होता. त्या प्रयोगाचे जे तुकडे झाले ते सगळेच एक-चालकांवरती होते व आहेत. संघ व संघ परिवार एक चालकांवरती असल्याचा उघड पुरस्कार करीत असला तरी वाजपेयींच्या पंतप्रधानपदाच्या काळात अडवाणींना उपपंतप्रधान करावं लागलं होतं. याचा अर्थ संघ जरी एक चालकांवरती असण्याचे घोषित करीत असला तरी वाजपेयींच्या काळात त्यांना तसे करता आले नाही. आता मात्र परिस्थिती बदललेली आहे. मोदींना मिळालेल्या निर्णायक बहुमतांमुळे मोदी हे पक्षापेक्षा मोठे झाले आहेत. जशा इंदिरा गांधी पक्षापेक्षा मोठ्या होत्या. शरद पवारांना पक्षापेक्षा मोठं होण्यासाठी संघ परिवाराच्या मूक मदतीने राष्ट्रवादी कॉंग्रेसची स्थापना करावी लागली. असं असून देखील मोदींना लेखाच्या सुरवातीला म्हटल्याप्रमाणे घटक पक्षांना सत्तेत सामावून घ्यावे लागले आहे.

संसदेत व संसदेच्या बाहेर अखिल भारतीय अथवा राज्य पातळीवरील सगळ्याच पक्षांचा अजेंडा (कार्यक्रम) हा भांडवली विकासाचा आहे. विमानतळ, सहा पदरी, आठ पदरी रस्ते, मेट्रो रेल, मोनोरेल, स्मार्ट सिटीज हेच सगळ्याच विकासाच प्रारूप आहे. यासाठी मोठ्या प्रमाणात जमिनीची आवश्यकता आहे, प्रचंड प्रमाणात पाण्याची आवश्यकता आहे. म्हणजे मोठ्याप्रमाणात शेतीखालची जमीन पुढच्या काळात काढून घेतली जाणार आहे. पाणी फक्त शहरांची गरज भागवण्यासाठी वळवले जाईल.

आतापर्यंतच्या विकासात मानवी समूहातील जगण्याचे प्रमुख कारण जमीन, पाणी व नैसर्गिक संपत्तीच राहिलेलं आहे. मानवी समूह टोळ्या करून राहत होता. तेव्हा झगडा टोळ्या-टोळ्यांमध्ये होता आणि हरलेल्या टोळीतील बाईलाच गुलाम केलं जात होतं. आता परिस्थिती बदललेली आहे. सगळ्या जगातील 'आहे रे' ची एक टोळी झाली आहे 'नाही रे' मात्र टोळ्या टोळ्यांत विभागले आहेत. याही काळाचं एक सनातन सत्य असणार आहे. हरणाऱ्या 'नाही रे' च्या टोळ्यातील स्त्रियाच गुलाम होणार आहेत. मोदींच्या सत्तेवर येण्याने स्त्रियांच्या गुलामीची प्रक्रिया अधिक तीव्र व गतीमान होत जाणार आहे.

■

लेख

# स्त्रीमुक्ती-चळवळ पुरुषांना आपली वाटली पाहिजे

**प्रकाश नाईक**

भारतीय समाज आणि संस्कृतीचा इतिहास पाहता स्त्रीचे शोषण मोठ्याप्रमाणावर झाल्याचे दिसून येते. खरे तर स्त्रियांच्या सन्मानाची आणि स्त्रियांना माणूस म्हणून वागणूक देण्याची संस्कृतीही आपल्या देशात होतीच. संस्कृतीच्या सरमिसळीतून अशी एक व्यवस्था तयार झाली की, ज्या व्यवस्थेत स्त्रियांना शोषणाचा केंद्रबिंदू व्हावे लागले. स्त्री-पुरुषांना समानतेने व सन्मानाने वागवणारी समतावादी संस्कृती जात-धर्माच्या नावाखाली पद्धतशीरपणे क्षीण करण्यात आली. माणसाच्या अवमूल्यनाचा विचार मांडणारी विषमतावादी व्यवस्था प्रस्थापित करण्यात आली. बहुजन स्त्री-पुरुषांना गुलाम करण्यात आले. धर्म आणि प्रतीकांचा यासाठी अत्यंत खुबीने वापर करण्यात आला. असे असले तरीही या विषमतावादी व्यवस्थेला सातत्याने विरोध करीत शोषणमुक्त समाजनिर्मितीसाठी संघर्ष करणारी एक परंपराही या देशात निर्माण झाली.

समतावादी आणि विषमतावादी संस्कृतीतील हा संघर्ष आपण समजावून घेतला पाहिजे. दलित, आदिवासी, भटके, कष्टकरी, शेतकरी आणि स्त्रिया या समाज-व्यवस्थेचे बळी ठरले आहेत. एक मोठा जनसमूह विषमतावादी व्यवस्थेने गुलाम केला आणि त्याचे शोषण केले. शोषितांच्या संस्कृतीला, जगण्याच्या पद्धतीला, व्यवहारातल्या भाषेला, त्यांची कला, त्यांचे खेळ, पोशाख इत्यादी प्रत्येक गोष्टीला तुच्छ लेखून त्यांचा आत्मविश्वास मारण्याचे काम झाले. बहुजन समाज या षड्यंत्राला बळी पडला. स्वत:हून त्यांच्या जाळ्यात फसत गेला. बहुजन पुरुष या व्यवस्थेला शरण गेल्यामुळे त्याचे शोषण झालेच, शिवाय बहुजन स्त्रीचेही दुहेरी पातळीवर शोषण झाले.

या विषमतावादी व्यवस्थेला मजबूत करण्यासाठी बहुजनांचा हातभार लागला आहे, हे वास्तव आहे. हा त्यांच्या अज्ञानाचा भाग असेल, परंतु ही वस्तुस्थिती आहे. प्रस्थापितांनी स्वत:ची संस्कृती विकसित करताना त्यात बहुजनांना स्थान मिळणार नाही, अशी व्यवस्था केली. दुसऱ्या बाजूला प्रत्येक गोष्टीच्या मूल्यमापनासाठी काही निकष तयार केले. हा समाज ते निकष पूर्ण करणार नाही याचीही दक्षता घेण्यात आली. त्यामुळे आपण हे निकष पूर्ण करू शकत नाही व आपली जीवनसंस्कृती ही कनिष्ठ अथवा दुय्यम आहे, अशी मानसिकता बहुजनांची झाली. आपण त्यांच्याबरोबरीने जगू शकत नाही आणि आपण जे जगतो आहोत ती जीवनपद्धती चुकीची आहे, असा पेच निर्माण होऊन आपला आत्मविश्वास गमावून बसणे हे चुकीचे होते. आपली समृद्ध आणि विकसित अशी संस्कृती असताना त्यांच्या मान्यतेसाठी आपण प्रयत्न करण्याची आवश्यकता नव्हती. परंतु बहुजनांची अशी मानसिकता तयार होण्यासाठी वेगवेगळ्या गोष्टी कारणीभूत होत्या.

अशा पराभूत मानसिकतेतून बाहेर पडण्यासाठी बहुजन समाजाच्या पाठीशी एका विचारांची मोठी शक्ती होती. चार्वाक, बुद्ध, महावीर, नामदेव, कबीर, तुकाराम, शिवाजी, फुले, शाहू, आंबेडकर ते अण्णा भाऊ साठे आदी महामानवांच्या विचारांची परंपरा सोबत होती आणि आहे. ही विचार-ऊर्जा घेऊन प्रस्थापितांच्या विषमतावादी विचार चौकटीला आपण उद्ध्वस्त करू शकतो. यासाठी विषमतावादी व्यवस्थेची रचना आपल्याला समजून घ्यावी लागेल.

या देशात जे जे काही चांगले भव्य निर्माण झाले आहे, ते बहुजन समाजातील विविध समूहांनी निर्माण केले आहे. बहुजन समाज हा तंत्राला आणि तंत्रज्ञानाला महत्त्व देणारा समाज होता. या समाजाकडे निर्मितिक्षमता (Creativity) होती. म्हणून सभ्य, सुसंस्कृत आणि मानवी मूल्ये अनुसरणारा समाज होता. याउलट भटकणारा आणि तंत्रज्ञानापेक्षा 'मंत्राला' महत्त्व देणारा समाज विषमतावादी व्यवस्थेचा पुरस्कर्ता होता. त्यातून निर्माण झालेली व्यवस्था किती अमानुष असू शकते, हे आतापर्यंत आपण अनुभवलेच आहे. शेती करणारा समाज हा ज्ञानी होता. निसर्गाशी नाते टिकवून विकासाची संस्कृती निर्माण करणारा हा समाज होता. योग्य वेळी जमिनीची मशागत करणे, बी पेरणे, पिकांची देखभाल करून पीक काढणे, हा या समाजाच्या ज्ञानाचा भाग होता. परंतु शेती करणारा, कष्ट करणारा माणूस अप्रतिष्ठित आणि चार-दोन मंत्र म्हणून आयते खाणारा प्रतिष्ठित अशी व्यवस्था जाणीवपूर्वक रूढ करण्यात आली. आपल्यासोबत इतरांनाही जगवणारी, निसर्गावर प्रेम करणारी, सर्व सजीवांची काळजी घेणारी संस्कृती महान असते. परंतु अशा महान संस्कृतीला लहान करण्याचे, कमी लेखण्याचे काम विषमतावाद्यांनी केले. कुंभार, सुतार, लोहार, मातंग, चांभार इत्यादी कारागीर समूहांनी आपल्या ज्ञानाच्या जोरावरच समाजाच्या विकासात योगदान दिले. वडार, पाथरवट यासारख्या समूहांनी इमारती बांधल्या, शिल्पे कोरली. परंतु या सगळ्यांचे योगदान नाकारून त्यांची अप्रतिष्ठा करण्याचे काम या व्यवस्थेने केले.

बहुजन समाजाला प्रत्येक ठिकाणी तुच्छ लेखणे, त्यांचा अपमान करणे हा कार्यक्रम या व्यवस्थेने राबवला. बहुजनांची भाषा, कला, क्रीडा, साहित्य, संस्कृती यांचा अवमान करण्याची विषमतावाद्यांनी एकही संधी सोडली नाही. बहुजन समाजही त्यांच्या भूलथापांना बळी पडला. आपल्याच संस्कृतीचे अवमूल्यन करू लागला. बहुजनांची व्यवहाराची भाषा ही प्रमाणभाषेच्या तुलनेत, ग्राम्य, गावंढळ आहे असे सांगितले जाते. पण मूठभरांची भाषा ही कशी काय प्रमाण भाषा होऊ शकते? या प्रश्नाची चर्चा होणे आवश्यक आहे. बहुजन समाजाच्या विविध समाजघटकांत बोलल्या जाणाऱ्या बोलीभाषा या खूप महत्त्वाच्या आहेत. त्या त्या समूहाच्या व्यवहाराच्या भाषा आहेत. या भाषांना ग्राम्य संबोधून त्यांचा अपमान करण्यात आला. जी गोष्ट भाषेची तीच बहुजनांच्या कलांचीही आहे. शेकडो वर्षांची परंपरा असणाऱ्या लोककला या व्यवस्थेने तुच्छ व हिणकस ठरवल्या. ज्या कलांना मोठी परंपरा आहे, ज्या कलांनी बहुजनांचे मनोरंजन व प्रबोधन केले. त्या दुय्यम दर्जाच्या व मूठभरांसाठी सादर करण्यात येणाऱ्या कला मात्र अभिजात. हा पक्षपात इथल्या व्यवस्थेने केला आहे.

प्रस्थापित व्यवस्थेने मंत्राला व त्याच्याशी संबंधित असणाऱ्यांना महत्त्व दिले. तंत्राला, तांत्रिक ज्ञानाला, विज्ञानाला नेहमीच कमी लेखले. त्यामुळेच बलुतेदार, आलुतेदार, कारागीर यांच्यासह स्त्रियाही या व्यवस्थेच्या दृष्टीने शूद्र होत्या. स्त्रियांना कमी लेखले गेले असे म्हणण्यापेक्षा माणूस म्हणून वागवले गेले नाही, असे म्हणणे योग्य ठरेल. 'मनुस्मृती'ने म्हटल्याप्रमाणे 'न स्त्री स्वातंत्र्य अर्हती' हे स्त्रियांच्या बाबतीत काटेकोरपणे अंमलात आणले गेले.

महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, यांनी जो स्त्रीशूद्रातिशूद्रांच्या स्वातंत्र्याचा लढा उभा केला, तो आपण समजून घेतला पाहिजे. त्यांनी पुरुषसत्ताक, विषमतावादी व्यवस्थेच्या जोखडातून मुक्त होण्यासाठी कृती-कार्यक्रम विचारांच्या पातळीवर राबवला. त्यांच्या विचार व कार्यामुळेच स्त्रियांच्या मुक्ती चळवळीला शक्ती मिळाली.

बहुजनांच्या व स्त्रियांच्या शोषणाचे मूळ हे अविद्येत आहे, हे ओळखून महात्मा फुले व सावित्रीमाई फुले यांनी

पुणे या सनातन्यांच्या बालेकिल्ल्यात मुलींसाठी या देशातील पहिली शाळा सुरू केली. स्त्री स्वातंत्र्याचा विचार मांडताना त्या दृष्टीने समाजमन तयार करण्यासाठी फुले दाम्पत्याचे योगदान हे खूपच महत्त्वाचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विषमतावादी तत्त्वज्ञानाचा गाभा असलेल्या 'मनुस्मृती' हा ग्रंथ जाळून समतावादी विचारांची मांडणी केली. भारतीय संविधानाची निर्मिती करताना स्त्रियांच्या हक्क, अधिकारांचा त्यांनी काळजीपूर्वक समावेश केला. मनूच्या कायद्याला विरोध करताना स्त्रियांना समान संधी व प्रतिनिधित्व मिळेल अशी कायद्यातच तरतूद केली. शाहू महाराजांनी स्त्रियांच्या संबंधी जे कायदे आपल्या संस्थानात निर्माण केले, त्यामुळेही स्त्रियांच्या स्वातंत्र्य चळवळीला बळ मिळाले.

खरे तर आज ज्या स्त्रीवादाची मांडणी केली जात आहे, त्यात पाश्चात्त्य विचारवंतांच्या विचारांचा आधार घेतला जात आहे. स्त्रीमुक्ती, स्त्रीस्वातंत्र्य म्हणजे पुरुषांवर सूड उगवणे नव्हे, तर पुरुषांबरोबर समान पातळीवरचे सहजीवन स्वीकारणे. पण हा अर्थ आजच्या स्त्रीवादातून पुढे येताना दिसत नाही. एकटे राहणे, पुरुषांचा द्वेष करणे हा स्त्रीवाद होऊ शकत नाही. स्त्री आणि पुरुष या दोघांनी एकत्र येऊन शोषणविरहित, एकमेकांचा सन्मान करणारी व्यवस्था निर्माण करणे, हाच खरा स्त्रीवाद आहे.

हे सत्य आहे की, प्रस्थापित व्यवस्थेने स्त्रीला त्या बंधनात अडकवले. तिची विचार करण्याची शक्ती मारून टाकली आणि मानसिक, शारीरिक शोषण केले. फुले, शाहू, आंबेडकरांचा विचार स्त्रीला सन्मान देणारा, समान संधी देणारा आहे, हे समजून घ्यायला हवे. स्त्री-पुरुष दोघांनी एकत्रितपणे परस्परांचा आदर करत जीवनप्रवास करावा, हा या विचारातील मुख्य आशय आहे. महात्मा फुल्यांच्या सत्यशोधक समाजाच्या तत्त्वज्ञानात, बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारात हाच आशय दिसून येतो. प्रस्थापितांचा विचार झुगारून देऊन बहुजनांतील पुरुषांनीच स्त्रीच्या स्वातंत्र्यासाठी चळवळ हाती घेतली पाहिजे. हे फुले, शाहू, आंबेडकरांना अपेक्षित होते. त्यांचीच विचारधारा पुढे नेणाऱ्या सत्यशोधक अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचे परिशीलन केले असता बहुजन स्त्रीवादाची संकल्पना आपल्या ध्यानात येऊ शकते.

त्यांच्या 'आवडी' या कादंबरीत आंतरजातीय विवाहाचे चित्रण येते. एका घरंदाज घराण्यातील आवडी ही मुलगी माहेरच्या लोकांच्या दबावामुळे फेफरे येणाऱ्या उत्तम बरोबर लग्न करते. अर्थात फेफरे येण्याचा प्रकार लग्नानंतरच तिला समजतो. लग्न करते वेळी आजही मुलीला विचारात न घेण्याचा प्रतिगामीपणा आपल्या समाजात आहे.

आवडी लग्नानंतर धनाजी रामोशाच्या प्रेमात पडते आणि त्याच्याबरोबर लग्नही करते. स्त्रीला गृहीत धरणाऱ्या व्यवस्थेला विरोध करून ती बंड पुकारते. तिच्या भावाकडून तिचा खून होतो. परंतु समतेच्या विचारांसाठी, स्त्रीच्या अस्तित्वासाठी, जातीअंताच्या लढाईसाठी शहीद झालेली आवडी आपल्याला पाहायला मिळते.

'चिखलातील कमळ' या कादंबरीतील सीता मुरळीची मुलगी असते. तीसुद्धा मुरळी होऊन या व्यवस्थेच्या जात्यात भरडत असते. पण बळी हा पुरोगामी नायक इथल्या धर्मव्यवस्थेला ठोकरून सीताशी लग्न करतो. सीताच्या शोषणमुक्तीसाठी बळीने दिलेले योगदान याचा बहुजन स्त्रीवादाच्या अनुषंगाने विचार होणे आवश्यक आहे. स्त्रीने फक्त सहन करायचे, अन्यायाला विरोध करायचा नाही, असे ही व्यवस्था सांगत असते. पण 'चंदन' या कादंबरीतील चंदन ही नायिका आपल्या शारीरिक शोषण करणाऱ्याच्या अंगावर ॲसिडचा डबा ओतते. पुरुषी व्यवस्था अन्याय करते म्हणून अन्याय सहन न करता तो परतवून लावणारी ही नायिका विद्रोही आहे. 'मंगला' ही अण्णा भाऊ साठेंची नायिका 'हिंदूराव'

या नायकाबरोबर स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होते. जुलमी, अन्यायी ब्रिटिशांना विरोध करण्यासाठी थेट हातात बंदूक घेऊन नायकाबरोबर लढायला उतरते व त्यात त्या दोघांचा मृत्यू होतो. समतेच्या चळवळीसाठी, शोषणमुक्तीसाठी आपल्या प्रियकरासह बलिदान देणारी ही नायिका स्त्रीवादी विचारांना चळवळीला ऊर्जा देणारी आहे.

अण्णा भाऊ साठेंच्या साहित्यातील नायिका बंडखोर आहेतच, परंतु नायकही समतेच्या विचारांसाठी स्त्रियांना शक्ती देतात आणि दोघे मिळून शोषणकेंद्रित व्यवस्थेला पराभूत करण्यासाठी लढाई पुकारतात. अण्णा भाऊ साठेंचा विचार स्त्रीवादाच्या संदर्भाने मार्गदर्शक आहे हे यावरून लक्षात येते. स्त्रियांच्या मुक्तीची चळवळ पुरुषांनाही आपली वाटली पाहिजे. जर 'माणूस' हा या चळवळीचा केंद्रबिंदू असेल तर निश्चितच पुरुषही या चळवळीत सक्रीय होतील. अण्णा भाऊ साठे यांच्या 'वारणेचा वाघ' या कादंबरीचा नायक सत्तू भोसले हा वारणा खोऱ्यातल्या तमाम स्त्रियांचा भाऊ बनतो आणि आज एका महिला वाहकाला बसमध्ये एका माथेफिरूकडून अमानुष मारहाण होते. पण एकही स्त्रीपुरुष तिच्या मदतीसाठी जात नाही. म्हणजेच स्त्रीकडे संवेदनशीलतेने, माणुसकीने पाहण्यासाठी अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील विचार आवश्यक आहे. अण्णा भाऊंच्या साहित्यातील नायिका स्वाभिमानी, बंडखोर, बहुजनांच्या संस्कृती जपणाऱ्या आहेत. बहुजन स्त्रीवादी ही संकल्पना मांडताना, स्त्रियांच्या चळवळी करताना 'अण्णा भाऊ साठे यांच्या विचारांना सोबत घेऊन आपण पुढे गेलो तर निश्चितच चळवळ गतिमान होईल.

■

मु. पो. सरुड, ता. शाहूवाडी,
जि. कोल्हापूर
संपर्क : ८८०६६०२०६९

लेख

# वाडीची विराऊ

## विष्णू नारायण पावले

एका तळावरल्या पाच एकर नांगरून पडलेल्या रानात एखादंच झाड असावं नि त्या झाडाखाली गेलं की, बीजमंत्राचं प्रकटनं व्हावं. तो ऐकू यावा अगदी त्याचप्रमाणे वीरवाडीच्या (बिळाशी) येसाबाई पांडुरंग पाटील आपल्या आयुष्याची ओवी गात होत्या नि मी तन्मयतेने ऐकत होतो. बाईंचा जन्म १९३८ साली खुजगाव येथे झाला.

पण जन्माची कथा अशी की, ''माझ्या आधीचा माझा भाव वारला हुता. आय रडायची. रडणारच की. बाया म्हणायच्या, 'गप, रडू नगंस. तुला पोरगा हुईल.'' माझं जीवन जगलंय संताच्या हातनं. माझी भोगावची मावशी वारकरीन हुती. मग आज्जा म्हणाला, ''मी डबरा काढून आलूया. माझ्या हातावर द्या. मी डोळ्यावर काळं फडकं बांधतू आणि हिला पुरतू.'' तर मावशी म्हणाली, ''न्हाय न्हाय, तिच्या बाची उत्पन्न लागंल एवढी हाय.'' मग तिनं घेतलं हातातनं न् म्हणाली, ''असं करू नका. ती तिच्या नशिबाची!'' आज्जा गप्प झाला. संताच्या हातून जीवदान मिळालं. पण मी नको हुते म्हणून माझं नाव नकुबाई ठेवलं गेलं.''

वयानं शहात्तरी ओलांडली तरी डोईवरचा पदर आजही ढळला नाही. अपूर्वाईचे एक अक्षर आजही कमी झालेलं नाही. वृत्तीत नम्रता आणि प्रामाणिकपणा. ना माझ्या गावशिवेची. ना माझ्या रक्ता-नात्यागोत्यातली.

चाकोरीतलं चालणं. बोलण्यात स्पष्टपणा. खणखणीत वाणी. पाच वर्षांची झाल्यावर बापानं शाळेत घातली. गाव म्हणालं, 'तुका पाटील खुळा. पोरगा न्हाय म्हणून पोरगीला शाळेत घातलिया' नकुबाईंनी बालपणी पडेल ती कामं केली. भारत देश स्वतंत्र झाला त्या साली इयत्ता दुसरी झाली होती. हातात तिरंगा घेऊन ही चिमुरडी प्रभात फेरीत सहभागी झाली. वारकरी असणारे वडील वारले अन् शिक्षण थांबले. घरच्या जबाबदारीचा भार खांद्यावर घेतला. काळ्या फळ्यावरच्या पांढऱ्या अक्षरांपेक्षा काळ्या मातीतल्या हिरव्या अक्षरांनी लळा लावला. पिंड ही अक्षरं उजळू लागला. प्रसंगी शेतात औतही हाणले. बैलं, खुरं, ढोरं जतन केली.

बिळाशी (वीरवाडी) च्या पांडुरंग पाटलांशी विवाह झाला. तिथं नकुबाईची 'येसाबाई' झाली. पण नेणत्यापासून जाणत्यापर्यंत 'आऊ' म्हणूनच ओळखल्या जातात. या नुसत्या 'आऊ'च नाहीत तर लहानांसाठी जिजाऊ आहेत... माहेरच्या नकुबाई... अध्यात्मात जनाबाई... ओव्या गाणाऱ्या बहिणाबाई... अन् एक संसार सुरळीत चालवणाऱ्या 'येसाबाई' आहेत! जणू वीरवाडीच्या विराऊ आहेत!

त्यांना त्यांच्या आईनं बालपणापासूनच औषधांचं ज्ञान दिलं. मग कुणाची दाढदुखी, कुणाची पोटदुखी, कुणाला गालगुड्या असो की कुणाची वाट सरकलेली असो अगर कुणाला विंचू डसलेला असो अथवा मुतखडा, मूळव्याध असो. या सर्वांवर त्यांच्या हातगुणी औषधांचा रामबाण उपाय. विशेष म्हणजे माणसाच्या अगर जनावरांच्या जखमेवर त्यांनी गवांडीची बुकणी दिली की जखम मिटलीच म्हणून समजा. कुणाचा नया पैसा न घेता हातातलं काम सोडून त्या येणाऱ्याला औषध देतात.

मुळचीच सहिष्णूता त्यात अध्यात्माकडे ओढा. म्हणूनच प्रपंच करून परमार्थ करावा, हा संतसंदेश अंगात भिणला. म्हणूनच की काय त्या म्हणतात, 'पांडुरंगाशिवाय कुणाची सोबत नाही.' एवढंच नव्हे तर जीवनाच्या विद्यापीठात, अनुभवाच्या महाविद्यालयात, व्यक्तित्वाचा वर्ग चालवत असताना, त्यांनी दोघा मुलांना आणि चौघी मुलींना शालेय शिक्षण दिलेय. कारण त्या म्हणतात, "धडूत कपडा घेता येईल, पण वय उलटलं की शिक्षण घेता येणार न्हाय म्हणून कुणी अडाणी (निरक्षर) राहू नये, शिक्षण घ्यावे!" विशेष म्हणजे आऊ दुसरीपर्यंत जरी शिकल्या असल्या तरी त्यांना 'मोडी' येतेच, पण मराठीही उत्तम जाणतात. त्या हरिपाठाचे वाचन करतात.

पती आझाद हिंद सेनेत होते. (दुसऱ्या महायुद्धात होते.) पाच वर्षे नोकरी केली आणि सैन्य कपात केले तेव्हा ते घरी आले ते इथेच राहिले. पुढे त्यांना ताम्रपट मिळाला. प्रपंच सांभाळता सांभाळता नाशिक, पंढरपूर या तीर्थस्थळीही आऊ जाऊन आल्या. अध्यात्मात राहिल्या. दारात तीन झेंडे घेऊन नाथ उभा राहिल्याचा दृष्टान्त झाला आणि वारी घडली. त्यांच्या अध्यात्म ओढीची कहाणी अशीच... एकदा धसवाडी येथे कीर्तन होते. दारात तर मक्याचे वाळवण. एकाएकी आभाळ भरून आलेले. आणि नवऱ्याने खोटेपणा केला असा की, वाळवणाची पोती भरूच लागले नाहीत. आऊ गडबडल्या नाहीत. एकटीनं सात पोती भरून घरात आणली आणि ही जनाई धसवाडीला कीर्तनाला गेली.

दर्शनाला जाया
माझ्या हातात फुलपेला ।।
सयांनो सांगू किती
पांडुरंग म्या गुरू केला ।।

या विश्वासामुळेच वाडीत गोळा होणाऱ्या धान्याची पोती बारा बलुती आऊंच्या घरी ठेवत. पण त्यातला एक दाणासुद्धा कधीच हलला नाही. कुणी विश्वासाने पैशाचा डबा ठेवला, पण त्यातला एक आणा इकडे का तिकडे झाला नाही. गावात कुणाचे लग्न असो, ते आऊंच्या

पुढाकाराने पार पाडले जाई. कुणाचे अंतरंग त्यांनी दुखावले नाही. पर मेणाहुनी मऊ असणाऱ्या विष्णूदासांनी कठीण वज्रास भेदावे यासाठी त्या, 'झाड बघून घाव घालावा' अशा म्हणतात.

एकदा असे झाले की, बेऱ्यासाठी बारा बलुती गोळा झाली त्या वेळी

बारा बैत्यांनी
माझी ढेलज वेढली।
सासऱ्या पाटलाची
जुनी अंबारी फोडली।।

'बेरं' देण्यासाठी भात ठेवत ती कणगी फोडली न् बलुती तृप्त झाली. आजही पहाटे पाचला उठावं. जातं नाही तर निदान दिवसाच्या कामाला लागावं. दोन वर्षापाठीमागे म्हातारा वारला. आता त्यांची पेन्शन येते.

बोलता बोलता आऊंनी एक खंत व्यक्त केली की, ''टीव्हीनं समाधान केलं नाही. आजच्या दळप कांडपात जस नाही. कुठं ममतेचं नातं राहिलं नाही.''

त्यांनी स्वत:च्या मनगटाच्या जोरावर दणकट संसार उभा केला. मूळचाच गोड गळा. सात उभा राहायचा शेतमळा. संसाराविषयी विचारताच त्यांनी ओवीतून सांगितलं

दुबळं एवढं पण
जना लोकांनी नाकारिलं
तान्ह्या माझ्या बाळांनी
मोत्या पवळ्याचं जहाज
माझ्या अंगणी उतरिलं।।

... मुला-नातवांनी गोकुळ केलं. पण आजही त्या 'पोक्त माझा जीव। धाकटी माझी बुद्धी' या ज्ञानेशाच्या नम्रवृत्तीने त्या जगत आहेत. त्या म्हणतात, ''कुणीही असो, ममतेचं नातं राखा. व्यसनांच्या आहारी जावू नका. संतांचे बोल खोल आहेत ते जाणून घेऊन ज्ञानाची पेरणी करा. प्रेमच द्यावे न् प्रेमच घ्यावे!'

त्यांनी एक बोधकथा सांगितली, ''एका गावात एक व्यापारी राहत होता. त्याला तीन मुलगे होते. एकदा त्याने तीर्थयात्रेला जायचं निश्चित केलं. वर्षाने मागे येण्याची बोली केली. पण जाण्यापूर्वी तिघा मुलांवर एक जबाबदारी टाकली. तिघा लेकांना बोलावून त्याने एक-एक दाणा असे तीन दाणे दिले व सांगितले, ''मी वर्सानं मागं येतो. मागं आल्यावर मला तो दाखवा.'' त्यावर थोरल्यानं तो दाणाच खाऊन टाकला. मधल्यानं तो तसाच जपून ठेवला आणि धाकट्यानं तोच दाणा पेरून त्यापासून अनेक दाणे वाढवले... त्यामुळे आपणही असेच काम करावे. विचारांची पेरणी करावी.''

... आऊ उठल्या. मला दुधाचा कप दिला. ओव्या सांगितल्या, वाटलं की, एकदा गवत कापलं की पुन्हा उगवतं, पण माणसाला जन्म एकदाच लाभतो. त्याचे सोने करावे. जगणे सुंदर करावे.

■

मु. पावलेवाडी, पो. रिळे, ता. शिराळा,
जि. सांगली - ४१५ ४०८.
संपर्क : ९८८१२४१८८७

**मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय**

सगुणा त्रैमासिकाचे सुरुवातीपासून ते चालू अंकापर्यंतचे सर्व अंक मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयातील संदर्भ विभाग, १७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहायल मार्ग, दादर (पूर्व), मुंबई ४०००१४ मध्ये उपलब्ध आहेत, याची वाचक-अभ्यासक-संशोधकांनी नोंद घ्यावी. **- संपादक**

### लेख

## सगुणा इचारात

# नवनिर्मितीच्या नव्या वाटा

भाषा आणि वंश यांचा भारत निर्माण मधला सहभाग तपासताना लक्षात येते ती इथली प्रचंड विविधता. भारत हा एक अनेक छोट्या राष्ट्रांचं मोठं राष्ट्र आहे. त्यामध्ये असणाऱ्या असंख्य आणि जाती-भाषा-बोलीभाषा-त्या त्या परिसरातले भाषिक बदल यामध्ये विभागलेले असंख्य मानवसमूह त्या प्रत्यकाची थोडी थोडी वेगळी संस्कृती! त्यांचे उद्योग. व्यवसाय त्यावर आधारलेले अर्थकारण आणि निर्माण होणाऱ्या चालीरिती, परंपरा यांचा मेळ. समाजाची जडणघडण, उद्योग, व्यवसायाशी निगडित त्यांचंच एक-एक समूह!

यावर आधारित असणारा भारत. शेती-कृषी हा व्यवसायाचा अर्थकारणाचा आधार-शेतीवर आधारित व्यवसाय. शेती ही पारंपरिक शेती. ज्यामध्ये 'नफा' ही संकल्पना नव्हतीच! गरजेप्रमाणेच उत्पादन! जास्तीची जमीन रिकामी ठेवली जायची. त्यामुळे जमिनींचा कस वाढायचा. तिला कृत्रिम खतांची गरज पडत नसे. शेती पूर्णपणे पावसावर आधारित होती. उद्योग शेतीला या उद्योगातून भागवल्या जात त्याबदल्यात धान्य हा मोबदला ठरला जाई. ही त्या शेती व्यवसायाशी निगडित समाजाची जगण्याची रित-पद्धत-व्यवस्था होती. ही व्यवस्था पूर्णपणे स्वयंपूर्ण व्यवस्था! त्या काळात तरी दिसत होती. सगळे व्यवसाय एकमेकांवर आधारित. यातलीच कुठलीही कडी खालीवर झाली तर ते त्या समाजाचा तोल खालीवर व्हायचाच. यातूनच जातींची संकल्पना रूढ होत गेली. आधी व्यवसाय होते आणि मग व्यवसाय करणाऱ्यांची जात असं समीकरण घडत गेलं. ते-ते व्यवसाय व त्या त्या जाती अशा अनेक पिढ्या तयार होत होत त्यांचे वंश तयार झाले. आजही भारतीय खेड्यांमध्ये ही व्यवस्था संक्रमित स्वरूपात अस्तित्वात दिसते. खेड्यांमध्ये राहणाऱ्या लोकांचा तिथं असताना जाणवणारा प्रचंड आत्मविश्वास दिसतो. तो या व्यवस्थेमधून येणारी त्यांची जी बांधीव ओळख असते, त्यातून येतो. त्यांना त्यांच्या ओळखीचे प्रश्न तिथे पडत नाहीत. त्यांची भाषा-व्यवसाय-जात-वंश हे तिथे दृश्य स्वरूपात त्यांना जाणवत असते. त्याच्या विकृतीतून त्यांना त्या जातीचा गर्व किंवा कमीपणा जाणवू शकतो. पण त्यांच्या ओळखीचा संघर्ष नसतो. याच अवस्थेत व्यक्तीची जडणघडण होते. तर त्याच्या आवडीनिवडी, सवयी त्यावर आधारितच असतात. आणि त्याचा त्यांना धागा सापडत असतो. थोडक्यात व्यक्तीला आपली मुळं माहिती असतात आणि त्यावर त्याचं व्यक्तिमत्त्व उभं असतं. यातून ते-ते समाज त्यांच्या वैशिष्ट्यांसह उभे राहतात. या व्यवस्थेमध्ये त्या व्यक्तीला त्या समाजाचे संरक्षण व मार्गदर्शन दोन्ही मिळते. कामाची निश्चितता असते. गावांमध्ये या व्यवस्थेमध्ये शिस्त व स्वयंपूर्णता असते. एकमेकांवर असणारं अवलंबित्व प्रत्येकालाच मान व प्रतिष्ठा प्रदान करतं. सगळ्यांच्या नाड्या एकमेकांत गुंतलेल्या असल्यामुळे सगळे शिस्तीत पद्धती सांभाळतात. स्वयंपूर्णरितीने एक व्यवस्था कार्यरत राहोत. गावांमध्ये आजही पूर्ण भारतामध्ये ही व्यवस्था कार्यरत दिसते.

यामध्ये आलेल्या विकृत्या त्या शहरसंस्कृतीतून उदयाला आलेली व्यवस्था व त्यांचे दुष्परिणाम आहेत. भांडवलशाही, ब्राह्मणशाही यांनी राबवलेल्या नीती आहेत. व्यवस्था स्वयंभू व स्वयंप्रेरित असते. तेव्हा बाहेरच्या या विकृतींना वाव मिळत नाही. तेव्हा अनेक माध्यमे मदतीला

घेऊन त्याला खिंडार पाडून या नीती-अनीतीच्या मार्गाने व्यवस्था प्रभावित करतात व व्यक्तींना लालूच दाखवून - भूलवून वेगवेगळ्या प्रलोभनांच्या आहारी जायला भाग पाडतात. धन-काम यांच्या मोहाची जाळी चौफेर विसरून कुठल्या कुठल्या पद्धतीने या व्यक्तींना जाळ्यात घेतले जाते.

नफ्याचे सिद्धांत डोक्यात भरवून भांडवलशाहीने निसर्गप्रणित शेती उद्ध्वस्त करून टाकली. जमिनी-स्वत: रसायनांनी नासवून टाकली. पर्यावरणाचा तोल विस्कटला व लोकांची शेतीची नाळ तुटायला लागली. शिक्षण जीवनाभिमुख न राहता नोकरी मिळवण्यासाठी व तेवढ्या पुरतंच मर्यादित झालं. जमीन ही उपजीविकेचं साधन न राहता मालमत्ता म्हणून गणली जाऊ लागली. याच प्रक्रियेत शेतीवर अवलंबून असणारे उद्योग-व्यवसाय असणारे उद्योग व्यवसाय संकटात आले. कारखान्यांच्यात तयार होणारा मशीनचा माल लोकांना परवडू लागला. तो लोकांच्या पसंतीला यावा म्हणून जाहिराती-माध्यमे वापरण्यात येऊ लागली. गावाची मानसिकता शहराभिमुख होऊ लागली व बाजाराला बरकत येऊ लागली. भांडवलशाही - बाजार आपली मुळं रुजवू लागला. तेव्हाच समाजाची मुळं शेती व्यवस्थेतून सैल होऊ लागली.

शैक्षणिक व्यवस्था उपरी, राजकीय व्यवस्था भांडवल पुरक अशा पद्धतीने शेती संस्कृतीचा ऱ्हास सुरू झाला. रासायनिक खंत-बी-बियाणं यांच्या माऱ्यानं शेती नापीक व्हायला सुरुवात झाली. जी जमीन जीवन देणारी, संवर्धन करणारी, तिच्यातून मिळणारं अन्न प्रदूषित झालं. फळ, भाजीपाला यांच्या जास्त उत्पन्नाच्या हव्यासापोटी रासायनिक खते, कीटकनाशके व रसायने यांचा मारा करून ती प्रकृतीला अपायकारक होऊ लागली. या रसायनांमुळे प्रदूषित होणाऱ्या पाण्यामुळे लोकांचे आरोग्य धोक्यात येत आहे. एका बाजूला भरपूर उत्पन्न, विकास असं सूज आल्यासारखं जैविक शेती, आयुर्वेद, शुद्ध पाणी यांचा उदोउदो सुरू करायचा. हव्यासापोटी शेतकरी पैशाच्या आशेने भांडवलशाहीच्या सल्ल्याने शेतावर वेगवेगळे प्रयोग करू लागला. त्याच वेळेला मार्केटमध्ये त्याच्या मालाला उठाव कमी झाला. दोन्हा बाजूंनी नुकसान शेतकऱ्यांचे होऊ लागले. वेगवेगळ्या अमिषाने शेतकऱ्यांना जमिनीच्या मोबदल्यात कर्ज देण्यात येऊ लागले व भांडवलनीती हीच राहिली की शेतकरी कर्जाची भरपाई करू शकणार नाही. रसातळाला चाललेला शेतकरी जमिनी विकण्यासाठी मजबूर होऊ लागला. शेतकऱ्यांपुढे आत्महत्येशिवाय मार्ग राहिला नाही. भांडवलशाही पूरक सरकारे शेतकऱ्याला मदत करण्याच्या नावाखाली हजारो रुपयांच्या मदतनिधी, योजना दाखवण्यापुरत्या करतात. पण प्रत्यक्षात सर्व पैसा मधल्या मध्ये लोकप्रतिनिधी व सत्तेचे दलाल वाटून घेतात. ही सगळी कारस्थाने शेती आधारित व्यवस्था मोडीत काढण्यासाठीच राबवली जात आहे. वाड्या, वस्त्या, गावांमध्ये पाण्याची प्रचंड कमतरता आहे, पण रासायनिक दारू, हातभट्टी, देशी दारू मुबलक प्रमाणात उपलब्ध करून दिलेली आहे. नैराश्याने ग्रासलेला ग्रामीण शेतकरी, शेती आधारित व्यावसायिक, व्यसनांच्या आहारी आपसूकच जात आहेत. गुटखा, तंबाखू, बिड्याकाड्या, सिगरेटी, भाजकी तंबाखू इत्यादी सगळ्या गोष्टी टप्प्या-टप्प्यांवर मांडून लहान मुलांपासून म्हाताऱ्यांपर्यंत सगळ्यांसाठी सापळे तयार करून ठेवले आहेत. ग्रामीण मनुष्यजीवन वेगवेगळी व्यसने, बाजारातील मिळणारे घाणेरडे अन्न, बनावट नावाने विकली जाणारी बिस्किटे, बेकरी पदार्थ, लोणचे, पापड, मिठाई, पॅकिंगचे चीप्स, कुरकुरे या सर्व गोष्टींनी पोखरून आरोग्य लयाला गेले आहे.

लोकांचा ताजे अन्न, निरोगी दूध, भाजीपाला यावरचा लक्ष उडून टीव्हीतील जाहिरातीमध्ये दिसणारी पाकिटे व अन्न पदार्थ, टीव्हीवर चालणाऱ्या कुकरी शो मध्ये दाखवले जाणारे पदार्थ यांचा मारा करून, भांडवलशाहीने चुलीवरची

भाकर व भाजी यांना कधीमधीचं जेवण बनवून टाकलं आहे.

स्वयंपूर्ण आर्थिक, सामाजिक उतरंड असणारं समृद्ध खेड अर्ध शहरी, रोगट, गलिच्छ, दिशाहीन भरकटू लागलं आहे. जमिनीतले वारसे आणि जमिनीचे बाळसे दोन्हीही भांडवलशाहीने गिळंकृत करून टाकले आहे. मुळं आणि चेहरा हरवलेला समाज झुंडीने शहरांकडे स्थलांतरित होत आहे. आधीच गजबजलेली शहरे यांना कशी सामावून घेणार? जागा, पाणी यांच्या कसल्याही सोयी नसणाऱ्या वस्त्या शहरांमध्ये बिनबोभाट पसरत आहेत. ग्रामीण शेतकरी, गामीण व्यावसायिक अशी ओळख असणारे खेड्यातील स्त्री-पुरुष शहरांमध्ये केवळ भाषेच्या व जातीच्या आधाराने ओळखले जातात व राहतात. जाती अंताचे लढे व दास्यत्वाच्या गोष्टी विकृत स्वरूपात त्यांच्यापर्यंत पोहचल्यामुळे, घाबरलेले व असुरक्षित असे हे समाज आयतेच धार्मिक संघटना व मूलतत्त्ववाद्यांच्या हातात सापडतात. सरसकट केलेले कायदे व समानतेचे धडे त्यांच्यापर्यंत न पोहचल्यामुळे भेदरलेले, भांबावलेले व न्यूनगंडाने पछाडलेले हे समूह राजकीय संघटनांच्या पटावरचे प्यादे होतात. या समूहांच्या या परिस्थितीत ह्यांच्या स्त्रियांची अवस्था तर असहाय्य व शोषित आहे.

या समूहांकडे यांचे शरीरच वस्तुरूपाने बाजाराला खुणावत असते. भांडवलीशाहीने मानवजातीला वस्तुरूपाने बाजारात उभे केलेले आहे. या समूहाच्या शरीराचे अनेक अवयव बाजारात विक्रीला आहेत. गर्भाशये, किडन्या, हृदय, डोळे, यकृत, रक्त इत्यादी गोष्टी पैशांच्या अमिषाने विकत दिल्या जातात, सारासार विचार हरवून बसलेला हा समाज, व्यसनांच्या अधिन झालेला हा समाज कुपोषण व निष्कृष्ठ आहाराने, अपुऱ्या वैद्यकीय सुविधांनी जर्जर झालेले हे समूह बाजारात उभे आहेत! यांची ओळख भाषेच्या व जातीच्या आधारानेच होते. हीच ओळख आजची भांडवलशाही मिटवायला निघाली आहे. एक भाषा, एक राष्ट्र, एक धर्मग्रंथ हे ब्राह्मणशाहीचे चोचले या समाजाला परवडणारे नाहीत.

ओळखीच्या संघर्षाचे रूपांतर कशा-कशात होऊ शकते? कुठल्या विकृती यामध्ये प्रवेश करत आहेत? सगळ्यात पहिला परिणाम वाढलेला हिंसाचार, प्रदर्शनाची हौस, दिखाऊगिरी, गोंगाटाचं आकर्षण, माणसांचा एकमेकांवरील अविश्वास, असुरक्षितता, प्रचंड नैराश्य, खोट्या-फसव्या प्रलोभनांना बळी पडण्याची वृत्ती, कामासक्ती-धनसक्ती ओळखीच्या संघर्षातून वाढत आहेत. सगळा भरकटलेला समूह मेलेल्या मनाने निर्बुद्धपणाने जगत आहे.

भांडवलशाहीचा टोकाचा स्वार्थ या मानव समूहांना नाशाकडे ढकलतो आहे. या परिस्थितीतल्या संख्येने अधिक असणाऱ्या बहुजन स्त्रियांना अपुरे शिक्षण, लादलेली अकुशलता यामुळे बेरोजगारींच्या विळख्यात स्वस्तातली मेहनतीची कामे करण्यास भाग पाडले. या सर्व स्त्रियांमधली व्यवहाराची समज ओळखून राजकीय व्यवस्था बचत गटाच्या परिघात कोंडू पाहत आहे. कारभाराची समज जागी झालेली ही स्त्री मग कुठल्याही तडजोडीला तयार होते. बचतगटासारख्या संस्था राजकीय संघटनांचे समर्थक म्हणून बांधून ठेवतात. खूप मर्यादित अवकाश ठेवला जातो. या माध्यमातून पुढे आलेल्या कार्यकर्त्या या त्या त्या पक्षांच्या कार्यकर्त्या होतात व प्रचलित व्यवस्थेच्या आहारी जातात. ब्राह्मणशाही, पितृसत्ता व भांडवलशाही यांच्या विळख्यात हा समाज आपसूक बंदिस्त होतो. स्वतंत्र विचारसरणी परिवर्तनशील विचारसरणी यांना बदलवू शकत नाही. संघर्ष आणि स्वातंत्र्य यांपासून या स्त्रिया वंचित राहतात. या ओळख हरवलेल्या, अकुशल ठरवल्या गेलेल्या भांडवलशाही व्यवस्थेच्या बळी असणाऱ्या स्त्रिया राजकारणाकडे स्त्रीवादी दृष्टीने बघायला हव्या असतील तर त्यासाठी संघटित प्रयत्नांची गरज आहे. व्यवस्था त्यांना छोट्या-छोट्या आमिषांनी बांधू बघत आहे.

आपल्याला त्यांच्या वैचारिक परिवर्तनासाठी धीराने कार्यरत राहण्याची गरज आहे.

स्त्री सत्तेचा इतिहास मातृसत्ताक गणराज्यांचा होता. निऋती-हारितीचं पुर्न:प्रस्थापिकरण होणे गरजेचे आहे. माती-शेती-जाती-नीती यांचा योग्य मेळ बसवला पाहिजे. तरच उखडलेली मुळं मातीच्या आधाराने रुजतील. यासाठी या देशाचे समाजकारण, राजकारण, अर्थकारण अभ्यासून समजून घेतले पाहिजे. बहुजन स्त्रियांचा लढवय्या इतिहास व परिस्थितीशी दोन हात करण्याची विजुगीषी वृत्ती, तिचा प्रेरणादायी इतिहास सतत समोर ठेवला पाहिजे. या माध्यमातून आलेला आत्मविश्वास राजकारणाकडे वळवला पाहिजे. जोपर्यंत निर्णयक्षमता व प्रक्रिया या हातात येत नाहीत, तोपर्यंत अथक प्रयत्न गरजेचे आहेत. छोट्या-मोठ्या लढ्यांनी अल्पसंतुष्टी न वाढवता व्यापक संघटन वाढवणे व सवंग प्रसिद्धी, माध्यमांच्या आहारी न जाता, पैशांच्या मोहाला बळी न पडता दूरदृष्टीने मोठा लढा उभा केला पाहिजे. कल्याणकारी राज्य लयाला गेलेलं आहे. दाखवण्यापुरतं ही समतावाद शिल्लक नाही. धर्मवादी, वंशवादी, मूठभर भांडवलदारांचा वरदहस्त असणारा व त्यांच्या तालावर नाचणारा शासनकर्ता! अघोर व्यापारी यंत्रणा व मूढ, संमोहित, भिकारी प्रजा, असं दारुण चित्र अनेक दशकांपासून भांडवलदारांनी नियोजित पद्धतीने राबवायला सुरुवात केलेली आहे. भानावर राहून जागरूकपणे या परिस्थितीत हस्तक्षेप करून छेद द्यायला लागेल नाही तर साखळदंडांनी बांधलेल्या भारतमातेसारखं बहुजन स्त्रियांना या मुक्या-आंधळ्या-बहिऱ्या समाजाकडे बघत बसायला लागेल. आपलीच जमीन-शेती, कुटुंब, आपलं जंगल, आपलं पाणी, आपली माणसं, आपली गाणी हे सगळं वाचवणं आता बहुजन स्त्रियांच्या हाती आहे.

भांडवलशाहीच्या तालावर नाचणारे उच्चवर्गीय-उच्चजातीय, उपऱ्या, भाड्याच्या शिक्षणाला व संस्कृतीला या देशात रुजवण्याचा अट्टाहास करणाऱ्या बांडगुळी मनोवृत्तीचा मुकाबला करावा लागेल. बहुजनांचे उद्योग-व्यवसाय, कला, व संस्कृती या सगळ्यावर कब्जा करून पोट भरणाऱ्या या मूठभरांचा बंदोबस्त करणं, फारसं कठीण नाही.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व फातिमा शेखनी घेतलेल्या कष्टामुळे शिक्षणाची दारं उघडून त्या प्रकाशात उजळून निघालेल्या दिवट्या आपल्याच जागरण गोंधळ करू लागल्या. हा ज्ञानाचा प्रकाश बहुजनांच्या पणत्या-समया कशा प्रज्वलित करतील, हे पाहून त्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. त्याच्या जोडीला नवीन व्यवसायांचे प्रशिक्षण आधुनिक तंत्रज्ञान-विज्ञान खेड्या-पाड्या-वस्तीत पोहचवायला भाग पाडले पाहिजे. श्रम आणि ज्ञान यांची अजोड सांगड घालत समतेचा लढा तीव्र केला पाहिजे. निर्मितीच्या अनेक वाटा रेखल्या पाहिजेत. बहुजन स्त्रियांची धडाडी व कौशल्ये आज घडीला कसे आकाराला येईल ते पाहिले पाहिजे. वेळेचे आणि परिस्थितीचे गांभीर्य ओळखून भांडवलशाहीच्या भूलथापांना बळी न पडता आपला लढा सुरू ठेवला पाहिजे.

बाजार अनेक रूपाने, अनेक अंगाने, अनेक प्रलोभने घेऊन वेगवेगळ्या माध्यमातून माणसाचा विचार गिळू पाहत आहे. खूप सावधपणे याचा विरोध केला पाहिजे. आपण कसं दिसलं पाहिजे, वागलं पाहिजे हे अभ्यासाने आपण ठरवले पाहिजे. फॅशन्स, सण-उत्सव हे आनंद वाढवण्यासाठी असतात. बाजाराच्या आहारी जाऊन कर्जबाजारी होण्यासाठी नसतात. या माध्यमातून आपण आपली खरी ओळख शोधू शकत नाही. त्यासाठी आपल्याला श्रमाचाच मार्ग अंगिकारावा लागेल. श्रम आणि ज्ञान एकत्र करून नवनिर्मितीच्या नव्या वाटा तयार कराव्या लागतील. त्या वाटांवरती आपली मूळं आपल्याला जरूर सापडतील...

■

लेख

शोभा करांडे

# क्रांतीचं स्वप्न पाहणारी 'ती'

आम्ही स्टेशनवर उतरलो. दोन दिवसांच्या प्रवासाने कंटाळून गेलो होतो. सामान घेऊन बाहेर आलो. समोरच 'ती' लगबगीने सामोरी आली. दोन्ही हातात पिशव्या. चेहऱ्यावर आनंद, पिशव्यांसहित आम्ही एकमेकींना भेटलो. लगबगीने तिने टॅक्सी ठरवली. आम्ही टॅक्सीत बसलो. पाचच मिनिटांत ख्याली खुशाली विचारून तिने माझ्यासाठी आणलेले स्वीट मला खायला लावले. अतिशय स्वादिष्ट अशा मिठाया तिने किती कष्टाने आणल्या ते सांगितले. आयुर्वेदाचा अभ्यास असणारी, योगा टीचर माझी मैत्रिण खाण्या-पिण्याचे धडे देत मला कलकत्त्याच्या हावडा ब्रिजवरून कालीकापूरला घेऊन जाऊ लागली.

उभा चेहरा, सरळ नाक, सडसडीत, पाठीत वाकलेला अशक्त बांधा, विरळ केस (मेहंदीने रंगवलेले), रात्रीही गॉगलचा चष्मा वापरणारी, ढगळ सैलसर कपडे, अखंड बडबड, मोठ्याने बोलणे, चालताना लगबग! आम्ही एकदम शांत. तिने उत्साहाने आमच्या बंदोबस्ताची तयारी सांगितली. तिच्या धावपळीने माझा थकवा पळून गेला. फ्लॅटवर आलो. हातपाय धुऊन येईस्तोवर गरम जेवण आले. जेवणानंतर झोपण्याची तयारी. एका रुममध्ये ती! त्याला ॲटच-टॉयलेट बाथरुम. आम्ही सगळे बाहेरच्या रुममध्ये. थोडेसे मच्छर होते. मी कुतूहलाने तिच्या रुममध्ये डोकावले तर मस्तपैकी छोटीशी मच्छरदाणी. वेलवेटची रजई, स्वच्छ उशा, स्वच्छ बेडशीट - मला थोडंसं आश्चर्य वाटलं!

सगळं आयुष्य चळवळीला वाहून घेतलेली, जंगलातसुद्धा गेलेली उच्चवर्गीय-उच्चवर्णीय मैत्रिण, तिचे वडील देवीच्या देवळात पुजारी होते. ती चौथीत असताना तिच्या मोठ्या बहिणीने आत्महत्या केलेली. याचा मोठा धक्का तिच्या मनाला बसलेला. जातीबाहेरच्या प्रेमप्रकरणातून आत्महत्या केली होती तिच्या बहिणीने बहिणीच्या आठवणीतच लहानाची मोठी झालेली. दहावीत असतानाच चळवळीत ओढली गेली. त्या आधीपासूनच तिच्यावर प्रेम करणारा, पण वेगळ्या विचारांचा तिचा मित्र अनेक वर्ष तिची वाट पाहत राहिला, पण तिच्या लढाईत सामील झाला नाही. म्हणून हिने त्याला नकार दिला. पुढे त्याने लग्न केले. पण त्याची छबी मनात घेऊन वावरणारी, बडबडणारी आनंदी-उदास मैत्रिण!

खूप संघर्ष केला. तिने चळवळीत असताना. घर-कुटुंब सोडले. भारावून गेलेली ती भानावर आली. तेव्हा प्रचंड निराशा सगळीकडे! ते वातावरण बदललेले होते. माणसे घराकडे परतायला लागलेली. राहिलेली स्वत:ला बदलायला लागलेली. भारावून उत्साहाने घरदाराशी विद्रोह करून बाहेर पडलेली ती परत घरात रुजू शकली नाही. आई-वडील वारले. मोठा भाऊ-छोटा भाऊ त्यांची कुटुंब हिला वेडी समजायला लागलेली. भावाने दिलेले लाखो रुपये इकडे-तिकडे देऊन ठेवलेले. आता कोणीही परत देत नव्हते. तिला ओळखणारी, तिच्यावर प्रेम करणारी, आदर करणारी माणसेपण आहेत! त्यांच्या मदतीने ती इतक्या मोठ्या शहरात राहते. आजही चळवळीशी निगडित असणाऱ्या व्यक्ती आणि त्यांचे लढे हा तिच्यासाठी आनंदाचा आणि आदराचा भाग आहे. शहरामध्ये चळवळीच्या माध्यमातून येणाऱ्या सगळ्या कार्यकर्त्यांची जबाबदारी ती आपली मानते. त्यांच्यासाठी धडपडते.

तिथले वास्तव्य त्यांच्यासाठी सुकर व सुखद करण्याचा प्रयत्न करते. त्यांचे कार्य, त्यांचे संदेश शहरातील इतर कार्यकर्त्यांना पोहचवण्यासाठी धडपडते. तेवढा वेळ प्रचंड कामात, उत्साहात असते. ती हे सर्व तिला योग्य वाटेल त्या पद्धतीने करते. पण तिची तळमळ, हेतू, उद्देश प्रामाणिक. या सगळ्यांनी एकत्र येऊन इथल्या- तिथल्या संयोगाने क्रांतीचं स्वप्न ती परत नव्याने बघायला लागते.

मला तिचा निष्पाप आशावादच आमच्या दोघीतला दुवा वाटतो! दुसऱ्या दिवशी तिच्या शहराजवळ मकर संक्रांतीला एक मोठी यात्रा भरते. लाखो लोक भारतभरातून तिथे जमतात. समुद्र पार करायला लावणारी काहीशी कठीण यात्रा! लाखो लोकांचे श्रद्धास्थान. धर्माच्या निगराणीत येणारी सामान्य बहुजन श्रद्धेपोटी तीन-तीन दिवस थंडी, ऊन, वारा, अंधार, कशाचीही पर्वा न करता त्या बेटावर मुक्कामाला राहतात. पण इतक्या जवळ हे ठिकाण असून माझी ही सामान्यांच्या क्रांतीचं स्वप्न बघणारी मैत्रिण त्या ठिकाणाकडे एकदाही गेली नव्हती. ती स्वत:हून माझ्याबरोबर आली. प्रवासात चर्चेमधून मी तिला आपल्या समतावादी संतपरंपरा व बहुजन श्रद्धांचा निसर्गाशी असणारा समतोल सांगत होते. आणि हे आपले वारसे आपण नाकारून आयतं घबाड धर्मांधाआधी मूलतत्त्वादी प्रवृत्तींच्या हाती कसे सोपवले आहेत, हे पटवण्याचा प्रयत्न करत होते. आजच्या परिस्थितीला या गोष्टीमध्ये हस्तक्षेप करणं हा चळवळीचा भाग आहे. या निष्कर्षाचा आम्ही बहुतेक पोहचलो. ती अंतर्मुख होऊन विचार करू लागली होती. माझ्या पेहरावामुळे, राहणीमानामुळे माझ्या निष्ठांबद्दल सांशक असणारी ती निश्चिंत झाली. अर्ध्या रात्री धाडसाने केलेला छोट्याश्या लाँचमधला प्रवास एक-दोन भाषांमधून तिथल्या श्रमजीवींशी साधलेला संवाद, तिथली संरक्षणव्यवस्था, तिथली राजकीय इच्छाशक्ती या सगळ्या बरोबर मी केलेला व्यवहार यामुळे तिचा माझ्याबद्दलचा आदर बराच दुणावलेल दिसला. त्यानंतर ती मला फारच गंभीरपणाने घ्यायला लागली. ती मला तिच्या रुमवर घेऊन गेली. जाता-जाता तिने असंही सांगत की, तिने आजपर्यंत तिची रुम, तिचा पत्ता कोणालही सांगितल्या नव्हता. पण तिला मला रुमवर न्यायला काही हरकत नव्हती. आम्ही दोघी ट्राममध्ये बसून तिच्या रुमवर गेलो. रस्त्यात तिने तिची शाळा, वडिलोपार्जित घर, तिच्या नातेवाईकांची घरे, शहरातल्या प्रतिष्ठीत लोकांची घरे दाखवली. माझ्यासाठी आणलेल्या क्लासी मिठाईचं दुकान दाखवं. शंभर वर्षांपूर्वीच्या एका जुन्या रेस्टॉरंटमध्ये तिने मला फिश कटलेट खाऊ घातले. त्या वेळी तिच्या चेहऱ्यावरचा आनंद मोहरीच्या तेलातल्या कटलेटपेक्षा हजार गुणांनी जास्त होता. तिने मला तिच्या घराजवळच रामकृष्ण परमहंस व शारदा मातेचं मंदिर दाखवलं व ती कशी कधीच आत जात नाही हेही सांगितलं, पण मला जायचं असेल तर ती माझ्याबरोबर यायला तयार होती. आता जाताना तिला होणारा आनंद आपल्याला कोणी पाहणार नाही ना या भीतीने झोकाळला होता. मंदिर फिरून पाहिलं. रामकृष्ण परमहंस व शारदादेवींचे सुंदर फोटो आत होते. प्रसाद म्हणून बत्तासा मिळाला. दुसऱ्या दिवशी दिवसभर शहरदर्शन. एक टॅक्सी ठरवली होती. तिच्या म्हणण्यानुसार ओळखीची घ्यायला पाहिजे होती, पण तो टॅक्सीवाला खुपच चांगला निघाला व त्याने आम्हाला फसवले नाही. पैसेही फार घेतले नाहीत. खूप सावध - घाबरून राहणारी ती थोडीशी आश्चर्यचकित झाली होती.

मला साडी नेसवून सरस्वती म्हणणारी ती तर मला धक्काच देऊन गेली. निघण्याच्या वेळी खूप भावनावश झालेली. विमान तळापर्यंत ती आलीच नाही. कारण खूप वाईट वाटले असते. नजरेआड जाईपर्यंत मी हात हलवत राहिली. महाराष्ट्रात ती वारीसाठी येणार म्हणाली.

मी मात्र सतत विचार करतेय तिच्या आयुष्याचा! आतल्या संघर्षाची उत्तरे बाहेरच्या परिस्थितीतच दडलेली असतात व त्यासाठी ती व्यवस्था व्यवस्थेत परिस्थिती बदलण्यासाठीच संघर्ष केला पाहिजे. मुक्तीच्या वाटेने चालताना नकळत परत अनेक बंधनांमध्ये अडकलेली ती मला खूप अस्वस्थ करतेय. छोट्या, छोट्या गोष्टींना करताना मला आधाराला घेणारी, ती आनंद घेताना अपराधबोधात जाणारी, पण त्या मोहातून मुक्तही न होणारी, जगणं खूप गुंतागुंतीचं करून ठेवलं का तिनं? सामाजिक भान, त्यातला सहभाग हा सहज आयुष्याचा भाग बनू शकत नाही का? सगळे हवं हवं असणारे सोडून देण्यामध्ये केवढी ऊर्जा नष्ट होते. परत त्या सगळ्या गोष्टींकडे ओढणारं मन! खूप 'द्राविडी प्राणायाम' करून त्याचं होणारं सांत्वन. आयुष्याच्या उतरणीला घाईघाईने चाललेली गोळीबेरीज खूप आत कुठेतरी लकलकत राहिली. त्या-त्या भारावलेल्या काळात तरुण वयात खूप मोठ्या संख्येने लढ्यात सहभागी झालेले असे अनेक कार्यकर्ते सगळीकडे विखुरलेले आहेत. सगळं आयुष्य जाळून टाकलेले. ध्येयवादी त्या काळात तुरुंगात गेलेले. पोलिसांकडून छळ झालेले, प्रामाणिक, स्वच्छ! भांडवलशाहीच्या या अत्युच्च काळात निराशेने ग्रासलेले, विक्षिप्त वाटणारे, समाजापासून तुटून राहणारे, पण अजूनही आपल्या तत्त्व व मूल्यांशी तडजोडी न करणारे! काळाशीच यांचा संघर्ष चालू आहे का?? लढाईची यंत्र-तंत्र-गती यामध्ये काळाप्रमाणे करावे लागणारे बदल. त्यासाठीचा धीर, योग्य वेळ साधण्यासाठीची सज्जता, या सगळ्या महत्त्वाच्या गोष्टी बाजूला सारून या कार्यकर्त्यांसाठी तरी ती निर्णायक वेळ लवकर यावी व यांच्या डोळ्यांना-कानांना ते जयघोष ऐकू यावेत. त्या विजयपताका डोळ्यांना दिसाव्यात!

■

**भाषण**

**संगीता पाटील**

# गाव बांधणीतील महिलांचे स्थान व योगदान आणि दिशा

आजच्या आपल्या विषयाकडे वळण्यापूर्वी आपण २०१४ सालातील काही घटनांकडे नजर टाकू या. स्त्रियांसाठी कसे होते हे वर्ष? लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका पार पडल्या. 'अच्छे दिन'चा नारा देत भाजपचे सरकार केंद्रात आले अन् महाराष्ट्रातही बऱ्याच घडामोडींनंतर सरकार स्थिर होते आहे. या सगळ्या राजकीय घडामोडींमध्ये स्त्रियांचे स्थान काय होते? या सोळाव्या लोकसभा निवडणुकीसाठी निवडणूक लढवणाऱ्या एकूण ५४३२ उमेदवारांपैकी ४०२ स्त्रिया म्हणजे ७ टक्के, तर महाराष्ट्रात ८५७ उमेदवारांपैकी ५८ स्त्री उमेदवार निवडणूक लढवित होत्या. ही आकडेवारी काय सांगते? स्त्रियांचा राजकारणातील सहभाग वाढायला हवा असे वरील आकडेवारी सांगते त्याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. परंतु सत्तेत येणाऱ्या स्त्रिया जर पुरुषसत्ताक व्यवस्था राबवत असतील तर स्त्रियांचा सत्तेत सहभाग वाढल्याने सर्व सामान्य स्त्रियांच्या, ग्रामीण शेती कसणाऱ्या, शेती आधारित उद्योग-व्यवसाय करणाऱ्या या स्त्रियांच्या जीवनात काही फरक पडेल का? तर याचे उत्तर नाही असेच असेल. इंदिरा गांधी देशाच्या पंतप्रधान, तर प्रतिभाताई पाटील या राष्ट्रपती असताना वरील बहुजन स्त्रियांच्या जीवनात बदल झालेला दिसत नाही.

आजची २०१५ सालची परिस्थिती पाहिली तर स्त्रियांचा अल्प का होईना सत्तेत सहभाग असला तरी दर

मिनिटाला एक बलात्कार, दर पाच मिनिटाला स्त्रीभ्रूण हत्या, स्त्रियांची नग्न धींड, घरातील त्रासाला कंटाळून आत्महत्या करणाऱ्या स्त्रिया, भूकबळी, शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या मुली, प्रेमविवाह केला म्हणून घडणारे ऑनरकिलींगचे प्रकार, खाप पंचायतीकडून एका महिलेला सुनावलेली बलात्काराची शिक्षा इत्यादी अनेक प्रकारच्या अन्याय अत्याचाराच्या घटना घडत आहेत हे कशामुळे? याचा आपण विचार करायला हवा. जर स्त्रियांचा सत्तेत सहभाग वाढला तर स्त्रियांवरचे अन्याय, अत्याचार कमी होतील. असे चित्र सतत मीडियातून उभे केले जाते. असे असेल तर मग सत्तेत असणाऱ्या स्त्रिया काय करतात? या स्त्रियांच्या प्रश्नांसाठी भांडताना दिसतायत का? तर नाही. वादग्रस्त विधाने, भ्रष्टाचाराचे आरोप, सत्तेचा गैरवापर याच विषयांमध्ये त्यांची कामगिरी अधिक दिसते आहे. भारताच्या परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज यांनी 'भगवद्गीता' हा संपूर्ण भारताचा 'धर्मग्रंथ' व्हावा अशी मागणी केली. भारतीय राज्यघटनेने प्रत्येक व्यक्तीला धर्मानुसार आचरण, धार्मिक कार्ये करण्याचा हक्क दिला असताना एका धर्माचा पूजनीय असणारा ग्रंथ संपूर्ण देशाचा धर्मग्रंथ कसा काय होऊ शकतो? याचा विचार व्हायला हवा.

मुख्यमंत्री पदावर असताना जयललिता यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप होऊन बंगरुळू न्यायालयाने त्यांना शिक्षा सुनावली. आता अजून एक घटना पाहू. भारताच्या शिक्षणमंत्री असणाऱ्या स्मृती इराणी या जोतिष्याकडे जाऊन भविष्य पाहतात. अशा विज्ञानाचा आधार नसलेल्या जोतिषशास्त्राकडे जाऊन भविष्य पाहणाऱ्या शिक्षण-मंत्र्यांकडून शिक्षणक्षेत्राचे भवितव्य काय? असा प्रश्न पडतो. लव्ह जिहादचा प्रश्न, छत्तीसगढमध्ये नसबंदीच्या शस्त्रक्रियेमध्ये औषधातील भेसळ, कालबाह्य झालेली औषधं, यामुळे झालेले स्त्रियांचे मृत्यू, सार्वजनिक ठिकाणी स्त्रियांची अपुरी स्वच्छतागृहे इत्यादी अनेक प्रश्न २०१४ सालात होते. त्यातील बहुतांशी प्रश्न २०१५ सालात आजही कायम आहेत. त्यामुळे देशाच्या, राज्याच्या, तालुका आणि गावच्या राजकारणात महिलांचा सहभाग असून चालणार नाही तर त्या महिला समाजहिताचे काम करतात की नाही ते पाहावे लागेल.

आता २०१४ सालातील स्त्रियांसदर्भातील काही आशादायी घटना पाहू. महाराष्ट्र सरकारने यावर्षी 'सुकन्या' योजना जाहीर केली. मुलांप्रमाणे मुलींचे शिक्षण, संगोपन व्हावे यासाठी मुलगी जन्माला आल्यावर तिच्या नावावर काही रक्कम बँकेत ठेवण्याचा निर्णय शासनाने घेतला. अर्थात काही नियमही त्यासाठी लागू केले. राज्य महिला आयोगाच्या रिक्त असणाऱ्या पदावर सुशीबेन शहा यांची नियुक्ती केली.

कर्नाटकमध्ये देवदासी प्रथा बंद करण्याचे आदेश उच्चन्यायालयाने कर्नाटक सरकारला दिले. पंढरपूर या ठिकाणी बहुजन समाजातील स्त्री आणि पुरुष दोघांचीही पुजारी म्हणून नियुक्ती झाली. देशातील १७ महत्त्वाच्या बँकांपैकी ७ बँकांच्या सीईओ या महिला आहेत. मुंबईमध्ये अत्याचारग्रस्त महिलेला पोलिस ठाण्यात जावे लागणार नाही तर १०३ नंबरच्या हेल्पलाईनवर संपर्क साधताच जवळच्या ठाण्यातील महिला पोलिस अधिकारी घरी येऊन तक्रार नोंदवून घेईल, अशी घोषणा मुंबई पोलिस आयुक्तांनी केली. या सर्व घटनांबरोबरच संशोधन, खेळ, कला, साहित्य, चित्रपट इत्यादी क्षेत्रांमध्ये स्त्रियांचा सहभाग लक्षणीय राहिला. आता देशातील आणि महाराष्ट्रातील असणाऱ्या अशा परिस्थितीत आजच्या काळात गावबांधणीतील महिलांचे स्थान, योगदान, आव्हाने आणि दिशा काय असेल यावर चर्चा करू.

मानवाच्या इतिहासाकडे पाहिले तर भटक्या, टोळी अवस्थेपासून त्याची प्राथमिक शेती, पशुपालन ते स्थिर

जीवन अशा समाजव्यवस्थेचा उदय झाला. टोळी-टोळीने आणि गटा-गटाने मानवाची जेव्हा भटकी अवस्था होती त्या वेळी गर्भावस्थेमध्ये स्त्रियांना एकाच ठिकाणी विश्रांतीसाठी थांबावे लागे. या वेळी शिकार करणे, कंदमुळे, फळे गोळा करून आणण्याचे काम टोळीतील पुरुषांचे होते. स्त्री ही एकाच ठिकाणी स्थिर असल्यामुळे तिचे निसर्ग निरीक्षण सुरू होते. पाऊस पडला की, जमिनीत असणाऱ्या बियांना कोंब येऊन त्याची रोपे आणि त्या रोपांना पाने-फुले-फळे कणसे येतात. या निरीक्षणातून स्त्रियांनी शेतीचा शोध लावला. प्रारंभी शेती हे स्त्रियांचे क्षेत्र बनले. त्यामुळे टोळीमध्ये स्त्रीला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. आज गावोगावी असणारी मातृदेवतांची शिल्पे, शेतात, नदी, तळी, विहिरी, पाणवठे, झाडाजवळ एखाद्या दगडाच्या स्वरूपात केली जाणारी उपासना आणि पावसाळ्याच्या सुरुवातीला पेरणीपूर्वी केले जाणारे सुफलनाचे विधी प्रामुख्याने स्त्रियाच करताना दिसतात. प्राथमिक शेतीच्या शोधाशी असणाऱ्या स्त्रियांच्या संबंधांचा तो ऐतिहासिक पुरावा म्हणावा लागेल.

विकसित होत जाणारी शेती आणि त्यातील तंत्रज्ञानाच्या आधारे मानवाच्या समूहाचे गटात रूपांतर झाले आणि स्त्रिया शेतीच्या तंत्रज्ञानाच्या आधारे मानवाच्या समूहाचे गटात रूपांतर झाले आणि स्त्रिया शेतीच्या तंत्र -कौशल्यात कुशल ठरल्या. मानव गटा-गटाने वास्तव्य करू लागल्यानंतर कुटुंबव्यवस्थेचा उदय होऊन स्थिर अशा समाजव्यवस्थेची सुरुवात झाली. यानंतर वर्णव्यवस्था उदयाला आली. वर्णव्यवस्थेने स्त्रियांना दुय्यम वागणूक द्यायला सुरुवात केली. मानवी समाज वेगवेगळ्या अवस्थांमधून प्रवास करत असताना मानवाच्या धार्मिक व्यवस्थेचा उदय झाला. धर्मव्यवस्था आणि वर्णव्यवस्था यामध्ये स्त्रियांचे स्थान दुय्यम राहिले.

जैन आणि बौद्ध धम्माच्या समाजव्यवस्थेच्या विरोधातल्या विद्रोहात स्त्रियांनी सहभाग नोंदवला. परंतु त्या वेळी स्त्रियांचे दुय्यमत्व कायम राहिले. भारतात व्यापारासाठी येणाऱ्या अरब, तुर्कांनी व्यापाराबरोबरच इस्लाम धर्मही भारतात आणला. भारतात इस्लामचा प्रचार आणि प्रसार झाल्यावरही स्त्रियांच्या परिस्थितीत फारसा फरक पडला नाही. मध्ययुगात सुरू झालेल्या भक्ती चळवळ, वारकरी संप्रदायामध्येही स्त्रियांनी पुरुषांच्या बरोबरीने सहभाग घेतला. सतराव्या शतकात तर जिजाऊंनी प्रत्यक्षपणे राज्यकारभार चालवला.

औद्योगिक क्रांतीनंतर लोखंडी नांगराचा शोध लागला आणि स्त्रियांचे शेतीव्यवस्थेतील स्थान दुय्यम होऊ लागले. ब्रिटिश भारतात आल्यानंतर त्यांनी शेतीचे व्यापारीकरण केले आणि भांडवली अर्थव्यवस्थेचा उदय झाला. औद्योगिक क्रांतीनंतर शेती पारंपरिकपद्धतीने न करता यंत्राच्या सहाय्याने केली जाऊ लागली. या वेळी शेतीतील उत्पादन पारंपरिक शेतीपेक्षा अधिक होऊ लागले. या अतिरिक्त उत्पादनाच्या मालकी हक्कांतून पुरुषांनी शेतीवर वर्चस्व प्रस्थापित केले आणि शेती कसणाऱ्या स्त्रियांचे अकुशलीकरण होऊ लागले.

शेतीमध्ये स्त्रियांचा सहभाग अधिक असे तेव्हा तिला प्रतिष्ठा होती. परंतु यांत्रिकीकरणामुळे तिचा सहभाग कमी होऊन स्त्रियांचे अकुशलीकरण झाले, त्याच वेळी शेतीशी संबंधित निर्णयप्रक्रियेत तिचे स्थान दुय्यम होऊ लागले. वरील सर्व गोष्टींचा विचार करता गावबांधणीतील स्त्रियांचा काय सहभाग असेल? याकडे आपण वळू या. गावातील प्रश्न सोडविण्यासाठी गावच्या राजकारणात स्त्रियांचा सहभाग वाढायला हवा. ज्या गावांचे नेतृत्व महिला करताहेत ती गावे विकासाच्या प्रक्रियेत गतिमान आहेत असे दिसून येत आहे. असे असले तरी काही ठिकाणी आरक्षणामुळे महिला सरपंच झाल्या तरी सर्व निर्णय हे त्या महिलेच्या कुटुंबातील पुरुष घेताना दिसतात. उदाहरण घ्यायचे झाले

तर नाशिक येथे झालेल्या सरपंच परिषदेत आलेल्या बहुतेक महिलांनी, ''आम्ही फक्त सही करतो सर्व निर्णय हे कुटुंबातील पुरुषच घेतात'' अशी भूमिका मांडली तर दलित स्त्रियांनी ''आम्ही सरपंच असलो तरी आमचे निर्णय हे गावातील राजकारणी घेतात आणि ते आमच्या घरातील पुरुषांना सांगतात मग ते आम्हाला सांगतात.'' असे आपले मत मांडले. म्हणजे दलित स्त्रियांवर दोन्ही बाजूंनी दुय्यमत्व लादले जाते. गावच्या विकासाच्या दृष्टीने या घटना योग्य नाहीत नेतृत्व विकासाच्या दृष्टीने तिचे अधिकार मिळायला हवेत. स्त्रिया त्यांचे निर्णय स्वत: घेऊ शकतात. असा विश्वास गावाने आणि सहकाऱ्यांनी दाखवायला हवा. आता दुसरे उदाहरण पाहू या. एका नगरपालिकेच्या नगराध्यक्षा स्वत: निर्णय घेऊन नगरपालिकेचा कारभार योग्य पद्धतीने चालवत होत्या. परंतु त्यांच्या पुरुष सहकाऱ्यांनी ऑफिसमध्येच त्यांचा विनयभंग केला. त्या वेळी त्यांच्या सहकारी असणाऱ्या महिलांनीही त्यांना मदत केली नाही. गाव बांधणीतील राजकारणातील स्त्रियांच्या सहभागाच्या या सामूहिक उणिवा आहेत त्या दूर व्हायला हव्यात.

गावच्या सर्वांगिण विकासात शैक्षणिक घटक महत्त्वाचा असतो. ज्ञानबंदी लादलेल्या स्त्रिया शिक्षणाने जागृत होऊ लागल्या आहेत. गेल्या दहा वर्षातील एसएससी, एचएससी, सीबीएसई, स्पर्धा परीक्षा इत्यादींचे निकाल पाहता या सर्व परीक्षांमध्ये गुणवत्ता यादीत मुलींचे स्थान वरचे आहे. गावामध्ये कुटुंबातील सर्व सदस्य शेतात काम करण्यासाठी जातात तेव्हा काही मुलींना घर सांभाळण्यासाठी घरी राहावे लागते आणि त्यांचे शिक्षण अर्धवट राहते, असे न होता सर्वच मुला-मुलींना शिक्षणाचा अधिकार मिळायला हवा.

ग्रामीण भागात महिलांचे आरोग्य हा ही एक महत्त्वाचा प्रश्न आहे. आजही महाराष्ट्रातील अनेक गावांमध्ये दवाखान्यांची सोय नाही. शेतात काम करताना झालेली इजा, सर्पदंश, कुत्रा चावणे इत्यादीं प्राथमिक उपचाराचीही सोय उपलब्ध नसते. याचेच एक उदाहरण म्हणजे कोल्हापूर जिल्हातील पन्हाळा तालुक्यातील पोहाळेवाडी या ठिकाणी आरोग्य केंद्र उपलब्ध नसल्यामुळे वयस्कर रुग्ण, लहान मुले, गर्भावस्थेत असणाऱ्या स्त्रिया यांना तालुक्याच्या ठिकाणी डोलीतून आरोग्य केंद्रात नेले जाते. महाराष्ट्रातल्या अनेक तालुक्यांमध्ये, गावांमध्ये यापेक्षा वेगळी परिस्थिती नाही. काही महिन्यांपूर्वी महाराष्ट्र शासनाने अशा गावांमध्ये आरोग्यकेंद्रांची स्थापना करून गावातील गर्भावस्थेत असणाऱ्या स्त्रिया आणि बाळंतीण स्त्रिया यांची माहिती घेण्यासाठी 'आशा'ची नेमणूक केली. गावातील महिलांची योग्य माहिती घेणे आणि त्यांना योग्य उपचारासाठी डॉक्टरांकडे पाठवणे यामधला दुवा म्हणून 'आशा' काम करतात. या सर्व्हे करणाऱ्या 'आशा'ना गावातील महिलांनी सहकार्य करणे गरजेचे आहे.

